NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 27) 15th September 2002 ( No : 5

# अकोला पूर नियंत्रण योजना विशेषांक : २००२

लेखन : प्रा.बी.टी.देशमुख

१. लहान लहान चार लघुपाटबंधारे प्रकल्पांचे बांधकाम आटोपले की ९३ टक्के पाणी अडविल्या जाते म्हणजे मग अकोला शहराचा पुराचा धोका टळलेला आहे, त्यामुळे आता अकोला शहरामध्ये (त्यावेळच्या अंदाजे १६ कोटी रुपये किंमतीच्या) पूरनियंत्रणाच्या कामावर खर्च करण्याची आवश्यकताच काय आहे? अशा प्रकारचा पाटबंधारे विभागामध्ये सुरू झालेला विचार अत्यंत अशास्त्रीय असून अकोला पूरनियंत्रणाच्या संदर्भात शासनानेच यापूर्वी विचारपूर्वक घेतलेले निर्णय फिरविणारा, लोकांना यापूर्वी सभागृहात व सभागृहाबाहेर दिलेली अभिवचने मोडून काढणारा व शहराच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत घातक असा आहे. मोर्णा नदीच्या जलग्रहण क्षेत्रात अकोला शहराच्यावर सुरू असलेल्या, ऑक्टोबर-नोव्हेंबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त चार लघुपाटबंधारे प्रकल्पांचा उल्लेख संक्षेपासाठी "चार लहान प्रकल्प" असा या विवेचनामध्ये करण्यात आला असून ८ जुलै १९९६ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त "अकोला शहर पूरसंरक्षक कामे भाग एक" व ६ जानेवारी १९९७ च्या शासननिर्णयान्वये प्रशासकीय मान्यताप्राप्त "अकोला शहर पूरसंरक्षक योजना भाग दोन" या दोनही योजनामध्ये अकोला शहरात चालू असलेली कामे यांचा उल्लेख "पूरनियंत्रणाची कामे" असा केलेला आहे.

### पूरनियंत्रणाची कामे थंड्या बस्त्यात पाडण्याचा प्रयत्न

२. चार लहान प्रकल्पाची कामे पूर्ण झाली म्हणजे पूरनियंत्रणाच्या बांधकामांची आवश्यकता राहात नाही अशा प्रकारचा विचार सभागृहामध्ये मांडण्यात पाटबंधारे मंत्र्यांना संपूर्णपणे अपयश आल्यानंतर सप्टेंबर २००२ मध्ये अकोला शहरात आलेल्या पूराने झालेले नुकसान लक्षात घेता पूरनियंत्रणाची कामे अजून पूर्ण झालेली नाहीत या लज्जास्पद वर्तनाबद्दल लोकांची क्षमा मागण्याचे सोडून आलेल्या पुराचे निमित्त करून पूर नियंत्रणाची कामेच रद्द करवून टाकण्याचा किंवा जिरवून टाकण्याचा विचार पाटबंधारे विभागाने जाहीरपणे लोकांच्या गळी उतरविण्याचा कोडगेपणाचा प्रयत्न सुरू केला असून त्यापासून सावध राहण्याची आवश्यकता आहे.

### अकोला शहरात महापुराने हाहाःकार

३. "महापुराने अकोला परिसरात हाहाःकार" "कोट्यावधीची हानी : हजारो नागरिक बेघर" "५ हजार घरांची पडझड : २ हजार घरे उध्वस्त" "खोलेश्वर भागात नुकसान : रमाबाई आंबेडकर नगरात हाहाःकार" "मोर्णा कोपली : पुरामुळे संपूर्ण अकोला शहरात हाहाःकार" "१० जण वाहून गेले : हजारो बेघर, कोट्यावधीची मालमत्ता पाण्यात" "मोर्णेला अकस्मात महापूर, नदीकाठच्या गावांना जबर तडाखा" "शेकडो बेपत्ता : करोडो रुपयाचे नुकसान, हजारो बेघर : अनेकांना जलसमाधी" अशा प्रकारच्या किंवा यासारख्या मथळ्यांनी दिनांक १ सप्टेंबर १९९४ रोजीच्या सर्व वृत्तपत्रामध्ये अनेकस्तंभी / सर्वस्तंभी जागा व्यापली होती. रकानेच्या रकाने भरून अकोला शहरावर आलेल्या या दुर्दैवी संकटाचे वृत्त सर्व वृत्तपत्रांनी आपआपल्या वाचकांना सादर केले होते. सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या अधिकृत आकडेवारीच्या आधारावर आज असे म्हणता येईल की या महापुरामुळे २२ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या व २८०७ गुरे मृत झाली. एकूण २२.३ कोटी रुपयाचे मालमत्तेचे नुकसान झाले. (प्रत्यक्ष नुकसान यापेक्षा जास्त असणार) नोंदबद्ध इतिहासात हा सर्वात मोठा पूर होता. यापूर्वीही या नदीला १९५९, १९७८ व १९८३ यावर्षी मोठे पूर आले होते. पूर्वी आलेल्या महापुरामध्ये १९८३ च्या पुराची पातळी १९९४ पेक्षाच नव्हे तर १९७८ च्या पुरपातळीपेक्षा कमी होती असे आढळून येते. अकोला शहरात दि. २५.७.१९७८ रोजी असाच महापूर आला होता. त्या दिवशी मोर्णा नदीचे पाणी सकाळी ९.३० वाजता वाढण्यास सुरुवात झाली व दुपारी ३.०० ते ४.०० वाजेच्या दरम्यान पुराने महत्तम पातळी गाठली होती व नंतर पूर उतरण्यास सुरुवात होवून रात्री ९.०० वाजताचे दरम्यान पूर पूर्णपणे ओसरला. त्यापूर्वी अकोला शहरात १९५९ साली जो महापूर आला होता त्यापेक्षाही १९७८ च्या पुराची पातळी जास्त होती.

### जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र

४. वेगवेगळ्या बैठकीतून कायम स्वरूपी पूरनियंत्रणाच्या योजनेची त्यावेळी होत असलेली चर्चा, वृत्तपत्रातून त्याबाबत प्रसिद्ध झालेला / होत असलेला विपुल मजकूर, यामुळे जिल्हा प्रशासनाने सुद्धा तातडीने हा प्रश्न हाती घेतल्याचे दिसून येते. १९ ऑक्टोबर १९९४ रोजी जिल्हाधिकारी, अकोला यांनी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, अकोला यांना एक पत्र पाठविले त्या पत्रात ते म्हणतात :-

" अकोला जिल्ह्यात मोर्णा, विद्रुपा व काटेपूर्णा ह्या नद्यांना सन १९५९, १९७८ आणि १९९४ मध्ये महापूर आलेले आहेत. सदर पुरांमुळे जिल्ह्यात मनुष्य व वित्त हानी फार मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. प्राथमिक अंदाजावरून असे दिसून येते की, मोर्णा, विद्रुपा व काटेपूर्णा नद्यांना पुरेशी साठवण क्षमता कशी निर्माण करता येईल असा प्रकल्प आखावा. **त्याचप्रमाणे अकोला शहराला पूर नियंत्रण संदर्भात पण उपयुक्त अशी योजना आखावी.** सर्वेक्षण कामासाठी लागणारा निधी आपले खात्याच्या उपलब्ध अनुदानातून भागवावा व निधी अपुरा पडत असल्यास आपण ह्या कार्यालयाकडे निधीची मागणी करावी जेणे करून २२४५ ह्या लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध केला जाईल". **जिल्हाधिकाऱ्यांचे हे पत्र काळजीपूर्वक वाचले तर त्यामुळे या नद्यांवर उर्ध्व भागात प्रकल्प व शहरात पूरनियंत्रणाची कामे या दोनही भागांचा उल्लेख आहे हे स्पष्टपणे दिसून येते.**

### श्री. यादवराव सुर्यवंशी यांची मेहनत

५. केवळ जिल्हाधिकारी यांनी पत्र लिहिले म्हणून नव्हे तर पूर आल्याच्या दिवसानंतर लगोलगच आपल्या कामाचा एक भाग म्हणून अतिशय तत्परतेने अकोला येथील लघुपाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता श्री. यादवराव सुर्यवंशी यांनी अकोला पूरनियंत्रण योजनेच्या साऱ्या तपशिलाची जुळवाजुळव सुरू केलेली होती. "**अकोला पूर संरक्षक योजना : टिप्पणी**" असे अगदी साधे नाव दिलेली ४ पानांची ही टिप्पणी तयार करण्यामध्ये श्री. यादवराव सुर्यवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बराच जीव ओतला होता असे स्पष्टपणे दिसून येते. जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र आल्यानंतरच्या १५-२० दिवसात त्यांनी ही टिप्पणी

सादर केलेली असली तरी त्या टिप्पणीमध्ये योजनेच्या विविधांगाचे जे बारीक सारिक तपशील भरण्यात आलेले आहेत त्यावरून वर वर नजर फिरविली तरी पूर आल्या दिवसापासूनच श्री. सुर्यवंशी व त्यांचे सहकारी या योजनेची बांधणी करीत होते असे स्पष्टपणे दिसून येते.

### योजनेचा भाग असलेल्या १० कामांची यादी

६. पूरसंरक्षक भिंत व त्याशिवाय शहरातून जाणाऱ्या मोर्णा नदीच्या आजुबाजूला करावयाच्या बांधकामाचे बारीक सारिक तपशील सुद्धा या टिप्पणीमध्ये नमूद करण्यात आलेले होते. **पूरनियंत्रणाची सहाकामे व प्रकल्पाची चार कामे या टिप्पणीमध्ये समाविष्ट होती. ही दोनही प्रकारची कामे परस्पर पूरक आहेत. किंबहुना प्राथम्य द्यायचे झाले तर ते पूरनियंत्रणाच्या कामांना द्यावे लागेल असे त्या टिप्पणीच्या वाचनावरून स्पष्टपणे दिसून येते.** चार प्रकल्पाची कामे पूर्ण झाली म्हणजे पूरनियंत्रणाच्या कामाची गरज राहणार नाही असे दुरान्वयाने सुद्धा श्री. सुर्यवंशी यांच्या योजनेमध्ये सुचविण्यात आलेले नाही. प्राथम्यक्रमानुसार करावयाच्या १० कामांची एक यादीच टिप्पणीमध्ये समाविष्ट होती. प्रत्येक कामाचा अंदाजित खर्च सुद्धा नमूद करण्यात आलेला होता. ती यादी (अ.नं. - कामाचे नाव - अंदाजित खर्च) पुढील प्रमाणे :-

१. दगडी पुलाचे खालील बाजूस पूर्वी बसविलेला अनिकट तोडणे .. ०.४० ल.रु.

२. गावातील सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यावर नॉन रिटर्न व्हाल्व्ह बसविणे .. २१.५० ल.रु.

३. मोर्णा नदीत दगडी पुलाजवळील अनिकटच्या खालील व वरील बाजूस असलेले कठीण खडकाचे अडथळे काढणे .. ३५.०० ल.रु.

४. अकोला शहरात मोर्णा नदीच्या दोन्ही काठावर ठिकठिकाणी अंदाजे ३.५० कि.मि.लांबीची **दगडी बांधकामात संरक्षण भिंत बांधणे** .. ७००.०० ल.रु.

५. मोर्णा नदीचे हिंगणा गावाजवळ फुटलेल्या पात्राचे ठिकाणी अंदाजे १.०० कि.मी. लांबीची दगडी भिंत बाधणे .. २५०.०० ल.रु.

६. हिंदू स्मशान भूमी ते रेल्वे पुलापर्यंतच्या भागात मोर्णा नदीचे पात्र बंद करणे .. ८६.०० ल.रु.

ही उपरोक्त सहाही कामे पूरनियंत्रणाची असून त्याशिवाय ७ ते १० क्रमांकावर चार प्रकल्पाची कामे त्या योजनेमध्ये समाविष्ट होती.

### मूळ योजना विचारपूर्वकच केलेली होती ना?

७. पूरनियंत्रणाची कामे सर्वप्रथम, प्रकल्पाची कामे ही पूरक आहेत. दोनपैकी महत्त्व कशाला असेल? तर ते पूरनियंत्रणाच्या कामाला, हा कार्यकारी अभियंता श्री. यादवराव सुर्यवंशी यांच्या योजनेतील विचार हा पुढे एकट्या सुर्यवंशी यांचा विचार राहीला नाही तर तो पुढे मुख्य अभियंता, सचिव पाटबंधारे, मंत्री पाटबंधारे, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाचा निर्णय झाला, याचे विपूल व अधिकृत पुरावे या विवेचनामध्ये दिलेले आहे. त्यावेळच्या अधिकाऱ्यांना व पदाधिकाऱ्यांना काहीच अक्कल नव्हती असा पाटबंधारे सचिव व पाटबंधारे मंत्री यांनी आता घेतलेला पवित्रा केवळ बेजबाबदारीचाच नाही, तर अनुशेषग्रस्त भागाच्या द्वेषातून त्याच्या पोटात असलेल्या विषारी पान्ह्याच्या पोटी हा निर्णय जन्माला आलेला आहे याचेही पुरावे या विवेचनात दिलेले आहेत.

### मुख्यमंत्र्यांची जाहीर सभेत घोषणा

८. ७ ऑक्टोबर १९९५ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी अकोला शहराला भेट दिली व या भेटीच्या वेळी जाहीर सभेमध्ये १६ कोटीच्या अकोला पूरनियंत्रण योजनेस शासनाची मान्यता जाहीर केली. "अकोला शहरासाठी १६ कोटीची पूरनियंत्रण योजना - ना.मनोहर जोशी" या मथळ्याखाली ८ ऑक्टोबर १९९५ रोजीच्या अनेक दैनिकांमध्ये पुढील प्रमाणे एकसारखा मजकूर प्रसिद्ध झाला होता. :-

"मोर्णा नदीच्या पुरामुळे अकोला शहरात होणारी कोट्यावधी रुपयाची हानी टाळण्यासाठी शासनाने १६ कोटी रुपयाची नियंत्रण योजना तयार केली असून या योजनेला लवकरच मंजुरी देण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री ना. मनोहर जोशी यांनी केली." सर्वच वृत्तपत्रांनी ठळकपणे या घोषणेला प्रसिद्धी दिली होती हे नमूद करणे आवश्यक आहे.

### ती निव्वळ पोकळ घोषणा नव्हती

९. मंत्री किंवा मुख्यमंत्र्यांनी केलेली ती एक पोकळ घोषणा नव्हती हे पुढच्या घटनाक्रमावरून स्पष्टपणे दिसून येते. अकोल्याहून मुंबईला परत गेल्यानंतर लागलीच म्हणजे ९ ऑक्टोबर १९९५ रोजी मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयाने पाटबंधारे विभागाला एक पत्र पाठवून असे स्पष्टपणे कळविले होते की, :-

"दिनांक ७.१०.९५ रोजीच्या अकोला दौऱ्यात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अकोला शहरामधून जाणाऱ्या नदीच्या पुरामुळे पुन्हा नुकसान होऊ नये म्हणून पूरप्रतिबंधक कामासाठी सादर करण्यात आलेले प्रस्तावास अंदाजे रुपये १६ कोटी पूरप्रतिबंधक योजनेसाठी मंजूर केल्याची घोषणा केली आहे. आपणास विनंती करण्यात येत आहे की, यासंदर्भात आपण योग्य ती कार्यवाही त्वरित करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माननीय मुख्यमंत्र्याच्या अवलोकनार्थ सादर करावा"

### हा विचार त्यावेळी सुद्धा झाला होता, झाला नाही असे नाही

**१०.** मा. मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत ७.१०.१९९५ रोजी घोषणा केल्यानंतर, व मुख्यमंत्री यांच्या सचिवालयाने ९.१०.१९९५ रोजी पाटबंधारे सचिवांना पत्र लिहून कळविल्यानंतर नियोजन विभागामध्ये, वित्तविभागामध्ये व पाटबंधारे विभागामध्ये जानेवारी १९९६ ते मार्च १९९६ या काळात दोन प्रश्नांची जोरदार चर्चा सुरू झाली होती. त्यातील पहिला प्रश्न असा होता की, या योजनेचा वित्तीय आकृतीबंध काय असावा? शास्त्रीयदृष्ट्या लघुपाटबंधारे योजना पूर्ण केल्यानंतर पूरनियंत्रण भिंतीची आवश्यकता राहणार आहे काय? हा त्या चर्चेतील दुसरा महत्त्वाचा प्रश्न होता. १२ जुलै १९९९ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ९५८१ वरील अनुपूरक चर्चेमध्ये खुद्द पाटबंधारे मंत्र्यांनी जानेवारी १९९६ ते मार्च १९९६ या तीन महिन्यात मंत्रालयात याबाबत काय चालू होते याची माहिती पुढील शब्दात दिली :-

"अध्यक्ष महाराज, सध्याच्या धोरणाप्रमाणे **दहा टक्के लोकवर्गणी**, ४० टक्के अनुदान, ५० टक्के शासनाचे कर्ज अशा पद्धतीची योजना घेण्यात येते. या सबंध योजनेसंबंधी विचार व्हावा, बदल व्हावा म्हणून मागच्या अधिवेशनानंतर दि. २४.१.९६ ला नियोजन विभागाकडे आम्ही यासंबंधीची बैठक घेतली. दि. २२.३.९६ ला याची मार्गदर्शक तत्त्वे कोणती असावीत. **लघूपाटबंधारे योजना पूर्ण झाल्यानंतर पूर नियंत्रण भिंतीची आवश्यकता राहणार आहे का?** इ. संबंधात चर्चा झाली. दि. २.३.९६ रोजी नियोजन विभागाकडून शेरे आले. दि. ३०.३.९६ ला ५० टक्के अनुदान, ५० टक्के कर्ज....."

### सर्वोच्च पातळीवर दोनही प्रश्नांचे निर्णय झाले

**११.** योजनेचा आकृतीबंध काय असावा? हे एक व लघुपाटबंधारे योजना पूर्ण झाल्यानंतर पूर नियंत्रण कामांची आवश्यकता आहे की नाही? या दोनही प्रश्नाबाबतचा जानेवारी १९९६ ते मार्च १९९६ या काळातील गोंधळ दूर करून याबाबतची ठाम उत्तरे देणारे निर्णय त्यावेळचे मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी दिनांक ८.४.१९९६ रोजी याबाबत बैठक बोलावून, त्याबैठकीत घेतले व तसे आदेश दिले व त्या निर्णयांना पुढे मंत्रिमंडळाची मान्यता सुद्धा मिळाली.

***"सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल आणि जास्तीत जास्त आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल." असे स्पष्ट शब्दात पाटबंधारे मंत्र्यांनी सभागृहाला (२१ मार्च २०००) सांगितले. पण या संदर्भात त्यांनी काहीही केले नाही.***

### मा.मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेली बैठक

१२. मा. मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची ही जी एक वरिष्ठ पातळीवरील बैठक दिनांक ८ एप्रिल १९९६ रोजी बोलाविली होती या बैठकीला कोणकोण उपस्थित होते याबाबत कार्यवृत्तामध्ये पुढील प्रमाणे उल्लेख आहे :-

"वरील बैठकीस मा. मंत्री (पाटबंधारे व लाक्षेवि) तसेच खालील अधिकारी उपस्थित होते :-

श्री. व्यंकट चारी, प्रधान सचिव (वित्त)

श्री. बी.एस. बहादूर, प्रधान सचिव (महसूल)

श्री. के. नलिनाक्षन्, प्रधान सचिव (नगरविकास विभाग)

श्री. म.दि.पेंडसे, सचिव (लाक्षेवि)

श्री. अप्पलवार, सहसचिव (जलसंधारण)

श्री. श. वि. वाडेकर, सहसचिव (महसूल)

श्री. नवांगुळ, अधिक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला.

श्री. ह.क. पसरटे, उपसचिव (सिं.व्य.)

श्री. सुर्यवंशी, अधिक्षक अभियंता, बुलढाणा पाटबंधारे मंडळ, बुलढाणा."

### योजनेच्या स्वरुपाविषयीचा उल्लेख

१३. ८.४.१९९६ च्या या बैठकीमध्ये पूरनियंत्रण योजनेबाबत अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असे या बैठकीच्या कार्यवृत्तावरून दिसून येते. योजनेच्या स्वरुपाविषयी या कार्यवृत्ताच्या परिच्छेद ३ मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख आहे :-

"अकोला शहराच्या पूरनियंत्रणासाठी नदीच्या पात्रातील अनिकट (दगडी बंधारे) म्हणजे दगडी धरणे तोडणे आणि कठीण खडक फोडून पात्रातील अडथळे दूर करणे (रुपये ६७.७३ लक्ष) बायपासच्या खालील बाजूस रुंदीकरण करणे (४९.८० लक्ष) बायपासच्या वरील बाजूस नदीपात्रातील रुंदीकरण करणे (रु. ३५३.०६ लक्ष ) आणि पूर संरक्षक भिंत बांधणे (रु. ८१४.६४ लक्ष) ही कामे प्रस्तावित असून, त्याचा एकूण अंदाजित खर्च रु. १६.०९ कोटी इतका आहे. त्यापैकी पहिली दोन कामे तातडीची उपाययोजना म्हणून हाती घ्यावी."

### शासकीय खर्चाने राज्यस्तरीय योजना

१४. नगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता ही संपूर्ण योजना शासकीय खर्चाने घेण्यात यावी याबाबतचा अतिशय महत्वपूर्ण निर्णय या कार्यवृत्ताच्या परिच्छेद ४ मध्ये समाविष्ट आहे, तो पुढील शब्दात :-

"अकोला नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. अशा प्रकारच्या कामासाठी शासनाने कर्ज दिले तरी ते फेडण्यासाठी नगर परिषदेची परिस्थिती नाही., असे सचिव (नगरविकास) यांनी स्पष्ट केले. मा. मुख्यमंत्र्यांनी त्याला दुजोरा दिला. **त्यामुळे ही कामे शासकीय खर्चात राज्यस्तरीय योजना म्हणून घ्यावयाचे ठरले.**"

### निरनिराळ्या खात्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित केल्या

१५. अकोला पूर नियंत्रण योजनेच्या कामामध्ये वेगवेगळ्या खात्यांचा संबंध येत असल्याने कोणत्या खात्याने कोणती कामे पार पाडावी याबाबतच्या जबाबदाऱ्या निश्चित करणारे निर्णय ८ एप्रिल १९९६ च्या मा. मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या परिच्छेद ६ व ७ मध्ये नोंदविलेले आहेत ते पुढील शब्दात :-

"या कामांच्या अंदाजपत्रकास पाटबंधारे विभागाने प्रशासकीय मान्यता द्यावयाची आहे. तसेच ही कामे पाटबंधारे विभागाने करावयाची आहेत. प्रस्तावित दोन कामे जून महिन्यापूर्वी म्हणजे पावसाळ्यापूर्वी करावयाची आहेत असे पाटबंधारे विभागाने पाहावयाचे आहे.

तिवसा व पुनोती ही दोन धरणे जलसंधारण विभागाने प्रशासकीय मान्यता देऊन पूर्ण करावयाची आहेत. यापैकी तिवसा धरणात काही पुनर्वसित कुटुंबे येतात. या कुटुंबांचे पुन्हा पुनर्वसन करावे लागेल. ही बाब प्राधान्याने महसूल व वन विभागाने हाताळावी असे ठरले. "

### चार प्रकल्पांच्या कामांना पूर्वीच प्रशासकीय मान्यता मिळाली होती.

१६. मोर्णेच्या उर्ध्व भागामधील चारही प्रकल्पांना पूर्वीच म्हणजे १९९५ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्याशिवाय आणखी दोन प्रकल्प आम्ही घेणार आहोत असेही पाटबंधारे खात्यातर्फे त्या बैठकीत सांगण्यात आले होते. चार लघुपाटबंधारे प्रकल्पांना १९९५ मध्येच प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असल्याने त्यांना निधी उपलब्ध करून देणे गरजेचे होते. हा विषय स्वतः मा. पाटबंधारे मंत्र्यांनी काढला व त्याबाबत मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील या बैठकीत निर्णयही झाला. कार्यवृत्तातील तो उल्लेख पुढील प्रमाणे :-

"पूर नियंत्रणाच्या संदर्भात अकोला शहराच्या वरच्या बाजुला विद्रुपा व मोरणा या नद्यांवर ६ धरणे बांधण्याचे प्रस्तावित आहे. या धरणांच्या खर्चाकरिता आकस्मिकता निधी त्वरित उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. असे मा. मंत्री (पाटबंधारे) यांनी स्पष्ट केले. त्या दृष्टीनेही त्वरित कार्यवाही करण्याचे ठरले."

### मंत्रिमंडळाची बैठक झाली, निर्णयही झाला

१७. ८ एप्रिल १९९६ रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय करूनच मुख्यमंत्री थांबले नाहीत तर त्यांनी त्याप्रमाणे आदेश निर्गमित केले. आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करण्यासाठी त्याला मंत्रिमंडळाची मान्यता लागेल ही गोष्ट जेंव्हा त्यांच्या लक्षात आणून देण्यात आली तेव्हा १८ जुलै १९९६ रोजी झालेल्या मंत्रिंडळाच्या बैठकीसमोर हा विषय ठेवण्यात आला.

१६.१० कोटी रुपये अंदाजे खर्चाची अकोला पूर संरक्षक योजना खास बाब म्हणून संपूर्णतः शासकीय खर्चाने राज्यस्तरीय योजना म्हणून हाती घेण्यास मंत्रिमंडळाने या बैठकीत मान्यता दिली.

### मा. उपमुख्यमंत्र्यांनी सुध्दा तेच सांगितले

१८. चार प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता १९९५ मध्येच दिलेली असतांना पूरनियंत्रणाच्या कामांना आता मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली होती. मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले होते असे असतांनाही या कामाशी तत्कालीन उपमुख्यमंत्र्यांचा सुद्धा संबंध आला. पाटबंधारे विभागाचा कार्यभार त्यांच्याकडे असतांना सोमवार, दिनांक ९ डिसेंबर १९९६ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ११८५३ वर झालेल्या अनुपूरक प्रश्नोत्तरामध्ये या अकोला शहरातील पूरनियंत्रणाच्या कामाला मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे हेहि त्यांनी सांगितले व अधिवेशन संपण्यापूर्वी हे आश्वासन आपण पूर्ण करु असेही सभागृहाला सांगितले ते पुढील शब्दात :-

"**श्री.गोपीनाथ मुंडे** : जुलै ९५ नंतर शासनाने कार्यवाही केली आहे. मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता १६ कोटींना दिली असून १ कोटी ४९ लाख उपलब्ध करून दिले आहे. संपूर्ण प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यासाठी "मेरी" च्या टेक्निकल सँक्शनची आवश्यकता आहे. ती आल्यानंतर आठ दिवसाच्या आत मान्यता दिली जाईल.

**सभापती** : मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हे अधिवेशन संपण्यापूर्वी या

*"सभापती महोदय, जो १४ कोटी ६२ लाख रुपये खर्च करणे आवश्यक होते, तो पूर्ण खर्च या वर्षात केला जाईल." असे पाटबंधारे मंत्र्यांनी सांगितले (२१ मार्च २०००) व त्यानंतर "अध्यक्ष महोदय, उसमे साडे नऊ करोड रुपये खर्च करने की मांग सन्माननीय सदस्य कर रहे है, उतना जरुर करेंगे." असेही पाटबंधारे मंत्र्यांनी सभागृहाला सांगितले. पण या संदर्भात त्यांनी काहीही केले नाही,*

आश्वासनाची पूर्तता आपण कराल?

**श्री. गोपीनाथ मुंडे** : होय.

**सभापती** : मंत्रिमहोदय आश्वासन पूर्ण करतील"

### दहा टक्के लोकवर्गणी शहरावर बसविण्याचा प्रयत्न

**१९.** अकोला शहरावर १० टक्के लोकवर्गणी या कामासाठी बसविण्याचा काही लोकांचा प्रयत्न खुद्द मंत्रिमंडळानेच निर्णय घेतल्यामुळे पूर्णपणे अयशस्वी झाला. खरे म्हणजे मुख्यमंत्र्यांची बैठक झाल्यावर व मंत्रिमंडळाचा निर्णय होण्यापूर्वी शहरावर १० टक्के लोकवर्गणी बसविणारा शासननिर्णय ८ जुलै १९९६ ला **"जि. अकोला येथील अकोला शहर पूर संरक्षक कामे भाग-१ या कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत" निर्गमित करण्यात आलेला होता.** निर्गमित करण्यात आलेल्या या शासननिर्णयान्वये लोकवर्गणी बसविण्यात आली होती. **दुसरा शासन निर्णय २३.१०.१९९६ काढण्यात आला व तो पहिल्या शासननिर्णयात दुरुस्ती करणारा होता.** ही दुरुस्ती पुढील प्रमाणे होती. :-

"शासन निर्णय समक्रमांक, दिनांक ८.७.१९९६ मध्ये "या शासन निर्णयाव्दारे अकोला पुरसंरक्षक कामे भाग -१ या कामाच्या रुपये १४७.२० लक्ष (रुपये एक कोटी सत्तेचाळीस लक्ष वीस हजार फक्त) अंदाजित खर्चाच्या कामास शासन निर्णय क्रमांक एफडीडब्ल्यु १२४७/८२/पा-६, दिनांक १७.४.७१ नुसार योजनेच्या भांडवली खर्चाच्या ४० टक्के सहाय्य शासनाकडून, ५० टक्के कर्जरुपाने व नगरपालिकेकडून लोकवर्गणी १० टक्के भरणे या अटींस आधीन राहून या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे". **असे नमूद करण्यात आले होते. त्याऐवजी "या शासननिर्णयाव्दारे अकोला शहराच्या पूरसंरक्षणाची सुमारे १६.१० कोटी रुपये खर्चाची योजना शासकीय खर्चाने राज्यस्तरीय योजना म्हणून हाती घेण्यास शासन तत्त्वतः मान्यता देत आहे.** तसेच या योजनेचा पहिला टप्पा म्हणून अकोला पुरसंरक्षक कामे भाग -१ या कामाच्या रुपये १४७.२० लक्ष (रुपये एक कोटी सत्तेचाळीस लक्ष वीस हजार फक्त) अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे." **असे वाचावे.**"
*( 96 CACBEP 893-97 )*

### अकोला पूरनियंत्रण योजना भाग २ ला प्रशासकीय मान्यता

**२०.** एका बाजूला १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्न जसा निकाली निघाला तसाच मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे पूरनियंत्रणाची कामे सोडून न देण्याचा प्रश्न सुद्धा निकाली निघाला होता. एका बाजूला डिसेंबर १९९६ च्या अधिवेशनात सभागृहात मा. सभापतींनी दिलेले आदेश, मा. उपमुख्यमंत्र्यांनी अधिवेशन संपण्याच्या आत कारवाई करण्याचे दिलेले आश्वासन, यातून अकोला पूरनियंत्रण योजना भाग २ ला प्रशासकीय मान्यता मिळाली. **अकोला पूरनियंत्रण योजना भाग २ ला प्रशासकीय मान्यता प्रदान करणारा शासन निर्णय हा ६ जानेवारी १९९७ या तारखेला निर्गमित करण्यात आला.** मोर्णा नदीच्या दोनही तिरावर संरक्षक भिंत बांधणे व नदी पात्राचे रुंदीकरण करणे इत्यादी पूरनियंत्रणाच्या १४.६२ कोटी रुपये किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. चार प्रकल्पाच्या कामांना १९९५ मध्येच प्रशासकीय मान्यता प्रदान केली असतांना पूरनियंत्रणाच्या या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणारा शासननिर्णय जानेवारी १९९७ मध्ये निर्गमित करण्यात आला हे तेथे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

### जानेवारी १९९६ चे जानेवारी १९९७ या कालखंडातील घटनांचा आढावा

**२१.** जानेवारी १९९६ ते जानेवारी १९९७ या बारा महिन्याच्या कालखंडात अकोला पूरनियंत्रण योजनेच्या संदर्भात घडलेल्या घटनांचे व अधिकृत कागदपत्राचे अवलोकन केले असता पुढील निष्कर्ष हाती येतात. :-

१) विषयाचे महत्व लक्षात घेऊन मा. मुख्यमंत्र्यांनी स्वतः ८ एप्रिल १९९६ रोजी संबंधित सर्व विभागाच्या सचिवांची बैठक घेऊन याबाबतचे आदेश दिले. स्वतः पाटबंधारे मंत्री या बैठकीला उपस्थित होते.

२) दिनांक १८ जुलै १९९६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे हा विषय ठेवण्यात आला होता व त्या बैठकीत १६.१० कोटी रुपये खर्चाची ही अकोला पूर संरक्षक योजना संपूर्णतः शासकीय खर्चाने राज्यस्तरीय योजना म्हणून घेण्यास तत्त्वतः मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती.

३) मुळात १४७ लक्ष रुपये किंमतीचा शासननिर्णय ८ जुलै १९९६ रोजी (म्हणजे मुख्यमंत्र्यांची बैठक झाल्यावर व मंत्रिमंडळाची बैठक होण्याच्या पूर्वी) १० टक्के लोकवर्गणी शहरावर बसविण्याच्या आकृतीबंधाप्रमाणे निर्गमित झालेला होता, त्यामध्ये मंत्रिमंडळाच्या निर्णयाबरहूकूम दुरुस्ती २३.१०.१९९६ च्या शासननिर्णयाने करण्यात आली होती.

४) १६ कोटीच्या योजनेला तत्त्वतः मान्यता मिळाली व १४७ लक्ष रुपये किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता ८ जुलै १९९६ च्या शासननिर्णयाने मिळाली उर्वरित १४६२ लक्ष रुपये किंमतीच्या "टप्पा दोन" ला प्रशासकीय मान्यता ६ जानेवारी १९९७ च्या शासननिर्णयाने मिळाली.

### सहाही शासननिर्णयाच्या तारखा व क्रम पहा

**२२.** "अकोला पूर संरक्षक कामे भाग २" या प्रकल्पाला ६.१.१९९७ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यामुळे **अकोला पूरनियंत्रण योजनेचा भाग असलेल्या जवळ जवळ सहाही प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळण्याची एक महत्वपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली.** अकोला पूरनियंत्रणाशी संबधित या सहाही प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणाऱ्या तारखा म्हणजेच ते शासननिर्णय निर्गमित होण्याचा कालानुक्रम लक्षात घेण्यासारखा आहे. असलेल्या या सहा प्रकल्पांची नावे, प्रशासकीय मान्यतेचा दिनांक व किंमत पुढील प्रमाणे :- (१) ७ ऑक्टोबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त ७१.१६ लक्ष रुपये किंमतीची "सुकांडा २ (ता.मालेगांव) लघुपाटबंधारे योजना" (२) १८ नोव्हेंबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त ७२.५३ लक्ष रुपये किंमतीची "ब्राम्हणवाडा संग्राहक लघुपाटबंधारे तलाव

*अशी दुर्दैवी परिस्थिती येवू नये पण उर्ध्वभागातील चार प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर एकाच वेळी या सर्व धरणाच्या जलग्रहण क्षेत्रात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे धरणांची सुरक्षितता लक्षात घेऊन धरणांची दारे उघडण्याची पाळी आली तर १९९४ मध्ये झाली तेवढीच अतिवृष्टी झालेली असली तरी येणारा पूर त्यापेक्षा कितीतरी जास्त असेल.अशा दुर्दैवी प्रसंगी अकोला शहरातील त्यावेळचे संतप्त नागरिक ज्यांच्या पुतळ्यावर शेणाचे गोळे मारतील त्यातील पहिला पुतळा आजच्या पाटबंधारे मंत्र्यांचा व दुसरा पुतळा आजच्या पाटबंधारे सचिवांचा असेल. तिसऱ्या जागेवर आजच्या मुख्यमंत्र्यांना उभे करण्याचा पाटबंधारे विभागाचा प्रयत्न त्यांनी यशस्वी होऊ देऊ नये अशी मा.मुख्यमंत्र्यांना कळकळीची विनंती आहे.*

योजना" (३) १८ नोव्हेंबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त ४८४.८८ लक्ष रुपये किंमतीची "उर्ध्व मोरणा (मेडशी) संग्राहक लघु पाटबंधारे प्रकल्प योजना" (४) १८ नोव्हेंबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त १८९७.३३ लक्ष रुपये किंमतीची "दगडपारवा लघुपाटबंधारे प्रकल्प योजना" (५) ८ जुलै १९९६ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त १४७.२० लक्ष रुपये किंमतीची "अकोला शहर पूर संरक्षक कामे भाग एक." (६) ६ जानेवारी १९९७ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त १४६२.५४ लक्ष रुपये किंमतीची "अकोला शहर पूर संरक्षक कामे भाग दोन." अकोला पूरनियंत्रणाची कामे आज निरर्थक ठरविणाऱ्या पाटबंधारे मंत्र्यांनी व पाटबंधारे सचिवांनी या सहाही शासननिर्णयांच्या तारखा काळजीपूर्वक पाहिल्या तर आपली कृती किती निरर्थक आहे हे त्यांच्या लक्षात येईल. चार प्रकल्पांना १९९५ मध्येच प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असतांना व ती कामे प्रगतीपथावर असतांना शास्त्रीय दृष्ट्या पूरनियंत्रणाची कामे टाळणे योग्य नव्हते हे लक्षात घेवूनच ५ वा व ६ वा शासननिर्णय १९९६ व १९९७ मध्ये काढण्यात आला.

## पूरनियंत्रणाची कामे अनावश्यक आहेत तर मग भूसंपादन कशासाठी केले?

**२३.** शासनाच्या सर्वोच्च पातळीवर याबाबत सक्षम निर्णय झालेले असल्यानेच व पूरनियंत्रणाची कामे अपरिहार्य असल्यानेच या कामासाठी प्रत्यक्ष भूसंपादनाची कारवाई सुरु झालेली आहे. "अकोला पूर नियंत्रण योजना भाग २ च्या कामासाठी अंदाजे २९.४५ हेक्टर खाजगी जमिनीच्या भूसंपादनाचे प्रस्ताव पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी मा. जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे सादर केलेले आहेत, हे खरे आहे काय; (२) असल्यास, भूसंपादनाचे प्रयोजन लक्षात घेता उक्त भूसंपादनाबाबत आतापावेतो काय कारवाई करण्यात आली आहे व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे; (३) कारवाई करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग १,२ व ३ ला महसूल मंत्र्यांनी शुक्रवार, दिनांक १७ डिसेंबर १९९९ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक २१ ला पुढील प्रमाणे एकत्रित उत्तर दिले होते. "**श्री. अशोक चव्हाण :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी अकोला पाटबंधारे विभाग, अकोला या भूसंपादन संस्थेकडून अकोला पूर नियंत्रण योजना भाग २ अंतर्गत एकूण ९ प्रस्ताव मार्च, ९९ मध्ये जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ४ प्रकरणात खाजगी वाटाघाटीद्वारे जमिनीचा ताबा घेण्यात आलेला **असून पैकी ३ प्रकरणात ८० टक्के आगावू मोबदला संबंधितांना देण्यात आलेला आहे.** उर्वरित ५ प्रकरणी त्रुटींची पूर्तता करुन कलम ४ ची अधिसूचना प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे." या कामाचे महत्व लक्षात घेता आवश्यकता पडली तर या **भूसंपादनासाठी "अर्जन्सी क्लॉज" सुद्धा लावला जाईल** असे मा. महसूलमंत्र्यांनी अनुपुरक चर्चेमध्ये सांगितले. त्यानंतर **सेक्शन ४ ची अधिसूचना ३० मार्च २००० च्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली.**

एका बाजूला जिल्हाधिकाऱ्याकडे भूसंपादनासाठी प्रस्ताव पाठविले पण पूरनियंत्रण भाग २ च्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या शासननिर्णयामध्ये मंत्रालयीन गलथानपणामुळे भूसंपादनासाठी एक रुपयाची सुद्धा तरतुद करण्यात आली नव्हती. किती जमिन संपादन करावी लागेल याबाबतचे अंदाजसुद्धा पूर्णपणे चुकले. ८२.२० हेक्टर इतकी जास्त जमिन या कामासाठी संपादन करावी लागेल हे उशिरा लक्षात आले, यामुळे लक्षावधी रुपयाचा खर्च वाढत आहे हा काय लोकांचा दोष आहे काय?

## अनुशेष मोजमापाचे मापदंड बदलविण्याचा प्रयत्न

**२४.** गेल्या २-३ वर्षात पाटबंधारेमंत्री व पाटबंधारे सचिव यांच्या नेतृत्वाखालील पाटबंधारे विभागाची भूमिका अनुशेषग्रस्त भागाचा खुपच द्वेष करणारी झाल्याचे अत्यंत उघडपणे दिसून येते. जलसिंचन या विकासक्षेत्रातील अनुशेषाच्या मोजमापाचे मापदंडच बदलून टाकण्याचा एक अत्यंत विषारी प्रयत्न पाटबंधारे विभागाने केल्याचे दिसून येते.

**जिल्हा घटक धरून दांडेकर समितीने या विकास क्षेत्राचा अनुशेष निश्चित केलेला होता. त्याच मापदंडाने अनुशेष व निर्देशांक समितीने अनुशेष निश्चित केला.** एकाएकी पाटबंधारे विभागाने "**जिल्हा घटक धरून पाटबंधारे प्रकल्पाचा अनुशेष काढणे योग्य ठरत नाही**" अशी मोठीच 'क्रांतिकारक' भूमिका रंगनाथन समिती समोर घेतली. केवळ नकारार्थी भूमिका घेऊनच ते थांबले नाहीत तर त्यासाठी "**खोरेनिहाय अनुशेष काढणे योग्य होईल**" असा प्रस्ताव पाटबंधारे विभागाने मांडला. हा प्रस्ताव अत्यंत विषारी होता. खोरे निहाय सिंचन क्षमतेचे मोजमाप करून अनुशेष निर्धारणाचा प्रस्ताव पोरकट पणाचा असल्यामुळे हास्यास्पद ठरेल याची जाणीव झाल्यामुळे पुढे पाटबंधारे विभागाने याबाबतचा तेवढाच विषारी पर्याय सोबतच रंगनाथन समितीपुढे देवून ठेवला होता तो पुढील शब्दात :-

"अनुशेष हा खोरेनिहाय परिगणित करून काढणे योग्य होईल. तथापि, जर जिल्हानिहाय अनुशेष काढावयाचा झाल्यास **जिल्ह्याची अंतिम सिंचन क्षमता आणि निर्मित सिंचन क्षमता या आकडेवारीच्या आधारे अनुशेष काढणे सुसंगत राहील**"

## अकोला जिल्ह्याचा दांडेकर समितीने निश्चित केलेला जलसिंचन अनुशेष

**दांडेकर समितीप्रमाणे जलसिंचन अनुशेषाचे मोजमाप :-** राज्यातील वाहितीखालील जमीन जून १९८२ मध्ये १८२४१ हजार हेक्टर, ओलीताखालील जमीन ४११४ हजार हेक्टर, राज्याच्या सिंचन क्षमतेची टक्केवारी : २२.५५ टक्के, जे सरासरीच्या खाली आहेत त्या जिल्ह्यांना सरासरीवर आणणे म्हणजे त्यांचा अनुशेष दूर करणे. या सूत्राप्रमाणे अकोला जिल्ह्यातील वाहितीखालील जमीन जून १९८२ मध्ये ८२० हजार हेक्टर, ओलीताखालील जमीन ९२ हजार हेक्टर,अकोला जिल्ह्याच्या सिंचन क्षमतेती टक्केवारी ११ टक्के, अकोला जिल्ह्याला राज्य सरासरीवर आणण्यासाठी निर्माण करावयाची सिंचनक्षमता **९२ हजार हेक्टर (हा झाला अकोला जिल्ह्याचा भौतिक अनुशेष)** १ हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण करण्याची किंमत त्यावेळी १० हजार रुपये धरण्यात आली. त्या हिशेबाने ९२ हजार हेक्टरचा अनुशेष दूर करण्याची किंमत ९२ कोटी रुपये, **म्हणजे ९२ कोटी रुपये हा झाला अकोला जिल्ह्याचा जलसिंचन या विकासक्षेत्राचा रुपयातील अनुशेष.**

## अकोला जिल्ह्याचा अनुशेष व निर्देशांक समितीने निश्चित केलेला जलसिंचन अनुशेष

**अनुशेष व निर्देशांक समितीप्रमाणे जलसिंचन अनुशेषाचे मोजमाप :-** या समितीने जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेष मोजण्यासाठी दांडेकर समितीच्याच मापदंडाचा वापर केला. राज्यातील वाहितीखालील जमीन जून १९९४ मध्ये १८०६२ हजार हेक्टर, ओलीताखालील जमीन ६७२६ हजार हेक्टर, राज्याच्या सिंचन क्षमतेची टक्केवारी ३७.२४ टक्के, जे सरासरीच्या खाली आहेत त्या जिल्ह्यांना सरासरीवर आणणे म्हणजे त्यांचा अनुशेष दूर करणे.

याच सूत्राप्रमाणे अकोला जिल्ह्यातील वाहितीखालील जमीन जून १९९४ मध्ये ८२७ हजार हेक्टर, ओलीताखाली जमीन १२६ हजार हेक्टर,अकोला जिल्ह्याच्या सिंचन क्षमतेची टक्केवारी १५ टक्के, अकोला जिल्ह्याला राज्य सरासरीवर आणण्यासाठी निर्माण करावयाची सिंचनक्षमता **१८१ हजार हेक्टर (हा झाला अकोला जिल्ह्याचा भौतिक अनुशेष)** सिंचन क्षमता निर्माण करण्याची किंमत समितीने ५० हजार रुपये प्रति हेक्टर धरली. त्या हिशेबाने १८१ हजार हेक्टरचा अनुशेष दूर करण्याची किंमत ९०५ कोटी रुपये, म्हणजे **९०५ कोटी रुपये हा झाला अकोला जिल्ह्याचा जलसिंचन या विकासक्षेत्राचा रुपयातील अनुशेष.**

## अकोला जिल्ह्याचा पाटबंधारे विभागाने सुचविलेल्या नविन मापदंडानुसार निश्चित होणारा जलसिंचन अनुशेष

**पाटबंधारे विभागाने सुचविलेल्या अंतिम सिंचन क्षमतेचा नवा मापदंड वापरुन जलसिंचन अनुशेषाचे मोजमाप :-** राज्याची अंतिम सिंचन क्षमता जून १९९७ मध्ये ६६८२ हजार हेक्टर, निर्मित सिंचन क्षमता ३२२७ हजार हेक्टर, राज्याच्या अंतिम सिंचन क्षमतेशी निर्मित सिंचन क्षमतेची टक्केवारी ४८ टक्के, जे सरासरीच्या खाली आहेत त्या जिल्ह्यांना सरासरीवर आणण्यासाठी **निर्माण करावयाची सिंचनक्षमता ५८६ हजार हेक्टर (हा झाला राज्याचा भौतिक अनुशेष) सिंचन क्षमता निर्माण करण्याची किंमत रंगनाथन समितीने अद्यावत दरसूचीप्रमाणे १ लाख रुपये प्रति हेक्टर धरली.** त्या हिशेबाने ५८६ हजार हेक्टरचा अनुशेष दूर करण्याची किंमत ५८६० कोटी रुपये, म्हणजे **५८६० कोटी रुपये हा झाला राज्याचा जलसिंचन या विकासक्षेत्राचा रुपयातील अनुशेष.**

याच सूत्राप्रमाणे अकोला जिल्ह्याची अंतिम सिंचनक्षमता जून १९९७ मध्ये ९९ हजार हेक्टर, निर्मित सिंचनक्षमता ६३ हजार हेक्टर, अंतिम सिंचन क्षमतेशी निर्मित सिंचन क्षमतेची टक्केवारी ६४ टक्के, अंतिम सिंचनक्षमतेशी निर्मित सिंचन क्षमतेची राज्यसरासरी ४८ टक्के आहे. राज्यसरासरीच्या खाली असलेले जिल्हे अनुशेष जिल्हे ठरतात. **अकोला जिल्ह्यामध्ये हीच टक्केवारी ६४ टक्के निश्चित करण्यात आल्यामुळे तो जिल्हा बिगर अनुशेष जिल्हा ठरतो. अर्थ असा की त्या जिल्ह्यामध्ये जलसिंचन या विकासक्षेत्राचा अनुशेष रुपये निरंक.** ज्या अकोला जिल्ह्याचा दांडेकर समितीने ९४ कोटी रुपये व अनुशेष व निर्देशांक समितीने ९०५ कोटी रुपये जलसिंचन या विकासक्षेत्रातील अनुशेष निश्चित केला त्याच अकोला जिल्ह्यामध्ये "अंतिम सिंचनक्षमता व निर्मित सिंचन क्षमतेची टक्केवारी" हा नवा मापदंड लावून अनुशेष शिल्लक नाही,

उलट हा बिगर अनुशेष जिल्हा आहे, असा निष्कर्ष पाटबंधारे विभागाने तयार केलेल्या व रंगनाथन समितीसमोर सादर केलेल्या निकषानुसार निष्पन्न होतो. **आहेना जादुचा दिवा? एका दिवसात सारा अनुशेष दूर होईल असे सुत्र सुचविण्यामध्ये अनुशेषग्रस्त भागाविषयीचा केवढा द्वेष भरलेला आहे हे दिसते ना आपल्या नजरेला?** मा. राज्यपालांनी आपल्या आदेशाच्या परिच्छेद ७.३ मध्ये "निर्देशांक व अनुशेष समितीने हे म्हणजे फेटाळले होते. कारण अंतिम सिंचन क्षमता ही स्थितीशील कल्पना नाही तर ती एक सतत बदलणारी संज्ञा आहे आणि म्हणून सिंचन क्षेत्रातील विकासाची सापेक्ष पातळी निर्धारीत करण्यासाठी तिचा एक स्थिर निर्देशक म्हणून उपयोग होऊ शकणार नाही." असा शेरा मारून पाटबंधारे विभागाचे थोबाड फोडले आहे.

### अवर्षण प्रवणक्षेत्र हा टाकावू मापदंड

२५. दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली तालुका घटक धरुन जलसिंचनाचा अनुशेष काढणे किंवा तसा तो काढावा म्हणून प्रयत्न करणे ही खरा अनुशेष असलेल्या जिल्ह्यांचा द्वेष करणारी कृति आहे हे आता पूर्णपणे सिद्ध होऊन चुकले आहे. " तालुकावार मागासलेपण जर आपण निश्चित केले तर मागास तालुक्यांच्या नावाने अत्यंत विकसित जिल्हेही जादा विकासनिधी आपल्याकडे खेचून घेण्यात यशस्वी होतील. कारण त्यांच्या क्षेत्रात विकास समान स्वरुपात झालेला नसतो." अनुशेष व निर्देशांक समितीने याबाबतचे पाटबंधारे विभागाचे म्हणणे फेटाळून लावल्यानंतरसुद्धा पुनर्रचित अनुशेष व निर्देशांक समितीसमोर २५ फेब्रुवारी २००० रोजी सादर केलेल्या पत्रासोबतच्या टिपणीच्या परिच्छेद ४.४ प्रमाणे "त्या तालुक्याचा अनुशेष भरुन निघायचा आहे" असे पाटबंधारे विभागाने बिनदिक्कतपणे नमुद केले आहे. हा केवळ अनुशेषग्रस्त भागाचा द्वेष नाही तर कमालीचा खोटारडेपणा सुद्धा त्यामध्ये आहे. मा. राज्यपालांच्या निदेशाच्या परिच्छेद ७.६ मधील "निर्देशांक आणि अनुशेष समितीने आपल्या अहवालात पाटबंधारे क्षेत्रातील अनुशेष अंदाजताना डी पी ए पी क्षेत्राबाबत विस्ताराने उहापोह केला आहे. **समितीने पाटबंधारे क्षेत्राचा अनुशेष निर्धारित करण्यासाठी तालुक्याला डी पी ए पी क्षेत्रातील एक घटक मानणे अमान्य केले आहे. डी. पी. ए. पी. क्षेत्रे असणारे जिल्हे हे पाटबंधारे क्षेत्रांत राज्य सरासरीपेक्षा बरेच वर आहेत. म्हणून राज्यातील अविकसीत जिल्ह्यांना प्राधान्य देऊन राज्य सरासरी पर्यन्त आणले पाहिजे. .... म्हणून तीन्ही प्रदेशात पाटबंधारे क्षेत्रासाठी निधीची वाटणी करताना डी पी ए पी क्षेत्र हे घटक म्हणून विचारात घेऊ नये."** हा मजकुर वाचला म्हणजे अत्यंत पक्षपाती वर्तन करणाऱ्या पाटबंधारे विभागाच्या पार्श्वभागावर राज्यपालांनी जोरदार लाथ हाणली असे म्हणण्याशिवाय गत्यंतर राहात नाही.

### अनिर्मूलनिय अनुशेषाचे नविन थोतांड

२६. **अनिर्मूलनीय अनुशेष (Irremovable backlog)** : शास्त्रीय मापदंडावर आधारित जलसिंचन या विकासक्षेत्राचा निर्धारित करण्यात आलेला प्रचंड अनुशेष हा पाटबंधारे विभागाच्या तोंडाला लागलेला काळिमा आहे, याची जाणीव ठेवून तो अनुशेष दूर करण्याचे प्रामाणिक प्रयत्न न करता वेगळाच व कृत्रिम मापदंडाच्या आधारे तो कमी कसा आहे हे दाखविण्याच्या प्रयत्नात संपूर्णपणे अपयश आल्यानंतर पाटबंधारे विभागाने अनिर्मूलनीय अनुशेष (Irremovable backlog) हे एक नवीन थोतांड पुढे आणले. ३ सप्टेंबर

---

# पुरामुळे अकोल्यात झालेल्या जीव व वित्त हानीस केवळ पाटबंधारे मंत्रिच जबाबदार

**– प्रा.बी.टी.देशमुख**

१) निसर्गाच्या प्रकोपामुळे जीवितहानी व वित्तहानी झाली तर त्याबद्दल नशिबाला बोल लावण्याशिवाय आपल्या हाती दुसरे काहीही शिल्लक रहात नाही. पण अकोला शहरामध्ये मोर्णा नदीच्या पुरामुळे जी मनुष्यहानी झाली, वित्त हानी झाली, मालमत्तेचे नुकसान झाले, त्याची संपूर्ण जबाबदारी ही केवळ एका व्यक्तीची आहे व त्या व्यक्तीचे नाव डॉ. पद्मसिंह पाटील हे आहे. केवळ नैतिक जबाबदारी म्हणून नव्हे तर या अपकृत्यांना ते व्यक्तिशः जबाबदार असल्यामुळे त्या पापाची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन त्यांनी पाटबंधारे मंत्रीपदाचा राजीनामा दिला पाहिजे.

२) ३१ ऑगस्ट १९९४ रोजी मोर्णा नदीला आलेल्या महापुरामुळे अकोला शहरामध्ये जे न भूतो न भविष्यती असे नुकसान झाले, तसे पुढे होऊ नये म्हणून मोर्णेच्या पाणलोट क्षेत्रात चार लघुपाटबंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या चार योजना समोर असतांना ८.४.१९९६ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी सर्व जबाबदार वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावून चार धरणे व त्याशिवाय १६ कोटीच्या योजनेबद्दल स्पष्टपणे आदेश दिले होते. ७ ऑक्टोबर १९९५ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी अकोला शहराला भेट दिली व या भेटीच्या वेळी जाहिर सभेमध्ये १६ कोटीच्या अकोला पूरनियंत्रण योजनेस शासनाची मान्यता जाहिर केली.

३) चार लघु पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. १ कोटी ४६ लक्ष रुपयाच्या अकोला पूर नियंत्रण भाग-१ ला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली व त्यानंतर १४.६२ कोटी रुपयाच्या अकोला पूरनियंत्रण योजना भाग-२ ला प्रशासकीय मान्यता देण्यास शासनाने थोडा विलंब लावला. त्यावेळच्या मा. उपमुख्यमंत्र्यांनी शुक्रवार, दिनांक १२ जुलै १९९६ रोजी विधानपरिषदेत बरीच खडाखडींची चर्चा झाल्यानंतर "अधिवेशन संपण्यापूर्वी या आश्वासनाची पूर्तता आपण करू" असे सभागृहाला सांगितले व **त्याप्रमाणे भाग-२ ला प्रशासकीय मान्यता प्रदान करणारा शासननिर्णय ६ जानेवारी १९९७ रोजी निर्गमित झाला.**

४) अकोला पूर नियंत्रण योजना भाग-२ ला १४.६२ कोटी रुपयाला प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यापैकी जवळजवळ ५ ते ६ कोटी रुपये खर्च सुद्धा झाला. गेल्या २-३ वर्षात या योजनेला निधीच उपलब्ध करून न दिल्यामुळे व इतर काही सुटलेल्या गोष्टी धरून या योजनेसाठी १४१ कोटी रुपये लागतील अशी भूमिका सन २००० मध्ये पाटबंधारे विभागाने घेतली. मंगळवार, दिनांक २१ मार्च २००० रोजी तारांकित प्रश्न क्रमांक २६६२ च्या निमित्ताने या प्रश्नावर बरीच चर्चा झाली. या चार लघुपाटबंधारे प्रकल्पामध्ये बरेच पाणी अडणार आहे, शिवाय पुराच्या दिवशी पंप चालविण्याचा खर्च महापालिकेला झेपणार नाही, असे मुद्दे पाटबंधारे मंत्र्यांनी मांडून पाहिले. तर्कशुद्ध युक्तिवादाच्या आधारावर आम्ही त्यांचे मुद्दे खोडून काढले. १४ कोटीचा खर्च वाढला असून सुधारित प्रशासकीय मान्यता १४१ कोटी रुपयाची घ्यावी लागेल हे मंत्र्यांनीच सांगितले. शेवटी त्यांनी **"सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल"** अशा शब्दात दिनांक २१ मार्च २००० रोजी सभागृहात आश्वासन दिले. इतकेच नव्हे तर **"नऊ-साडेनऊ कोटी रुपये खर्च या वर्षात करू"** असेहि स्पष्ट आश्वासन दिले. त्यातला एक शब्द त्यांनी पाळला नाही.

५) १४१ कोटी रुपयाच्या भाग-२ च्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या कामामध्ये (१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ पासून रेल्वे पुलापर्यंत मोर्णा नदीच्या दोन्ही तिरावर दगडी पूर संरक्षक भिंत बांधणे (२) हिंगणा गावापासून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील पुलापर्यंत नदीपात्राचे रुंदीकरण करणे व नदीच्या दोन्ही तीरावर मातीचे मार्गदर्शक बांध घालणे (३) हिंगणा गावच्या वरच्या बाजूला मातीचा बांध घालणे, काही पंपींगची यंत्रणा उभी करणे ही कामे आता पावेतो पार पडली असती तर आजचा हाहाःकार उडाला नसता.

६) मोर्णेच्या पाणलोट क्षेत्रामध्ये चार पाटबंधारे प्रकल्प बांधण्याची उपाययोजना ही पुरनियंत्रणाच्या कामी पडणारी एक उपयुक्त अशी उपाययोजना असली तरी अकोला पूर नियंत्रण योजना भाग-२ ची उपरोक्त कामे पार न पाडल्यास या उपाययोजनेची जोरदार 'रिॲक्शन' सुद्धा येवू शकते. संभाव्य अतिवृष्टी लक्षात घेवून अतिवृष्टीपूर्वीच्या काळात धरणातील पाणी साठा रिकामा करून पुरेशी साठवण क्षमता अतिवृष्टीसाठी शिल्लक ठेवण्याच्या कामाचे बिनचुक अंदाज बांधता न आल्यास किंवा असा अंदाज बांधल्यावर अंदाजापेक्षा जास्त अतिवृष्टी झाल्यास चारही प्रकल्प साठवण क्षमतेएवढे पूर्ण भरलेले असतांना एकाच वेळी पाणलोट क्षेत्रामध्ये होणाऱ्या अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने थोडेफार धरणही रिकामे करण्याचा निर्णय घेण्याची गरज भासली, तर नैसर्गिकरित्या येणाऱ्या महापुरामध्ये अशा निर्णयामुळे कृत्रिम कारणाने मोठी वाढ होते व अशा वेळी ही धरणे बांधली नसती तर बरे झाले असते असे वाटल्यावाचून रहात नाही. औषधाची जशी एक "रिॲक्शन" असते तशीच उपाययोजनेची सुद्धा "रिॲक्शन" असते. **नैसर्गिकरित्या जो पूर आला असता त्याला तोंड देण्यासाठी आपल्याला तयार रहावेच लागते. पण पूर्ण क्षमतेने भरून असलेल्या धरणातील पाणीसाठा एकाच वेळी या सर्व धरणांच्या पाणलोटक्षेत्रामध्ये होणाऱ्या अतिवृष्टीमुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या कारणासाठी थोडाजरी कमी करण्याचा निर्णय घ्यावा लागला तर "नैसर्गिकरित्या जो महापूर आला असता त्यात कृत्रिम कारणानी पडलेली भर"** ही या उपाययोजनेची

२००१ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. राज्यपालांशी विदर्भातील सर्वपक्षीय आमदारांची बैठक सुरू झाली. "अनुशेष व निर्देशांक समितीच्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या आहेत. १९९७-९८ पासूनच्या पुढच्या ७ वर्षात जलसिंचनाचा अनुशेष दूर करावा अशी एक शिफारस त्यामध्ये आहे. ३० जून १९९४ च्या राज्यसरासरीवर काढण्यात आलेला विदर्भाचा जलसिंचनाचा ४२६५ कोटी रुपयाचा अनुशेष वाढलेल्या दरसूची प्रमाणे २००५ सालापर्यंत १६ हजार कोटी रुपयाच्या वर जातो तेव्हा यावर्षापासून दरवर्षी किमान २ ते ३ हजार कोटी रुपयाचा निधी जलसिंचनाच्या अनुशेष निर्मूलनासाठी विदर्भाला उपलब्ध व्हावा" अशी मागणी करण्यासाठी आम्ही गेलो होतो. तसे आम्ही आमच्या लेखी निवेदनात सुद्धा नमूद केले होते. चर्चेच्या सुरुवातीलाच आमच्या असे लक्षात आले की, पाटबंधारे विभागाने जलसिंचन अनुशेषाबाबतची माहिती पुरविणारे १०-१२ तक्ते किंवा विवरणपत्रे मा. राज्यपालांना सादर केले होते. त्यातील एका विवरणपत्राकडे पहात राज्यपाल म्हणाले "विदर्भाचा जलसिंचनाचा रुपयामध्ये, फक्त २५८२ कोटी रुपयाचा शिल्लक अनुशेष दूर करावयाचा आहे असे पाटबंधारे विभागाचे म्हणणे आहे. त्या विभागाचे आणखी असेही म्हणणे आहे की, १८१.०७ हजार हेक्टरचा विदर्भाचा अनुशेष अनिर्मूलनीय आहे." म्हणजे तो दूर करताच येत नाही.

आकाशातून स्कायलॅब पडावी अशी आमची स्थिती झाली. जलसिंचन अनुशेषाच्या गेली १०-१५ वर्षे चालू असलेल्या चर्चेमध्ये "अनिर्मूलनीय अनुशेष" हा शब्द प्रथमच आमच्या कानावर आलेला होता. चर्चा चालू असतांना ऐनवेळी समोर आलेले ते (Statement showing remaining physical backlog as on 1st April 2000 and financial cost of removing this backlog in irrigation sector as per the identified projects in Vidarbha Region.) विवरणपत्र काळजीपूर्वक नजरेखालून घातले असता त्यामध्ये असे प्रतिपादन करण्यात आले होते की, विदर्भाचा जलसिंचन या विकास क्षेत्राचा एप्रिल १९९४ चा अनुशेष ७८४.७१ हजार हेक्टरचा (प्रमाण रब्बी समतुल्य SRE) आहे. त्यापैकी ३० जून १९९९ पर्यंत २१३.९७ हजार हेक्टरचा अनुशेष दूर झाला आहे, म्हणजे शिल्लक उरला ५७०.७४ हजार हेक्टरचा अनुशेष, त्यापैकी १८१.८७ हजार हेक्टरचा अनुशेष अनिर्मूलनीय आहे. म्हणजे आता शिल्लक राहीला ३८९.६७ हजार हेक्टरचा अनुशेष. त्याची रुपयामध्ये किंमत २५८२.५० कोटी रुपये. असे हे गणित पाटबंधारे विभागाने या विवरणपत्रामध्ये पाटबंधारे विभागाने मांडले होते.

या विवरणपत्रात विदर्भाचा दूर करता येवू शकत नाही असा जो १८१.०७ हजार हेक्टरचा अनुशेष दाखविण्यात आला होता तो सर्वात जास्त अनुशेष असलेल्या अमरावती व अकोला या दोनच जिल्ह्यांचा होता. अमरावती जिल्ह्याचा ८६.९१ हजार हेक्टर व अकोला जिल्ह्याचा ९४.१६ हजार हेक्टर असा एकूण १८१.०७ हजार हेक्टरचा "Irremovable backlog" पाहून मला तर खरोखरच अचंबा वाटला. मूळ अनुशेष दूर करण्याचे टाळण्यासाठी विकसित भागातील बलवान पुढाऱ्यांच्या बोटाच्या इशाऱ्यावर नाचणाऱ्या व त्यांची सतत थुंकी झेलण्यात आघाडीवर असलेल्या पाटबंधारे विभागाच्या सचिवांनी आपली सारी बुद्धिमत्ता पणाला लावून अनिर्मूलनीय अनुशेषाचे एक नवेच थोतांड पुढे आणले आहे अशी ते विवरणपत्र पाहून आमची भावना झाली.

---

**रिॲक्शन थोपवून धरण्यासाठी अकोला शहरातील पूर नियंत्रणाची कामे अत्यंत अपरिहार्य ठरतात.** हे 'शास्त्र' आहे आणि अशा पूरनियंत्रणाच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्वच धरणांना "महापुरात होणारी कृत्रिम वाढ" या कारणांचा शास्त्रीय विचार करावाच लागतो.

७) अकोला पूरनियंत्रण योजना भाग दोन ची उपरोक्त कामे रद्द ठरविण्याची हिंमत करणाऱ्या अधिकाऱ्यांने (अजून ती रद्द करण्यात आलेली नाहीत) किंवा मंत्र्यांने "उपरोक्त शास्त्रीय विचार हा चुकीचा आहे" असे प्रथम ॲफेडेव्हिट केले पाहिजे. म्हणजे उद्या ही चारही धरणे पूर्ण झाल्यावर जेव्हा महापुराचा या शहराला दुर्दैवी असा जादा (नैसगिकरित्या जो महापूर आला असता त्यात जादाची कृत्रिम भर पडून) फटका बसेल तेंव्हा त्या मंत्र्याला किंवा अधिकाऱ्याला अकोल्याच्या भर चौकात उभे करून फटके तरी मारता येतील.

८) पाटबंधारे विभागाने काही चूक केली, मंत्री व्यक्तिशः जबाबदार नाहीत, त्यांची केवळ नैतिक जबाबदारी आहे, असा हा विषय नाही.

(१) "या योजनेचा अंदाजित खर्च १४ कोटी रुपये होता, तो आता १४१ कोटी रुपयांवर गेला." असे व्यक्तिशः त्यांनी सभागृहात सांगितले व त्यानंतर "अध्यक्ष महाराज, अर्थात, शासनाला ही योजना पूर्ण करावयाची आहे. योजनेचा अंदाजित खर्च वाढणार आहे." असेही सांगितले. चर्चेच्या शेवटी **"सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल आणि जास्तीत जास्त आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल."** असेही स्पष्ट शब्दात त्यांनी सभागृहाला (२१ मार्च २०००) सांगितले. **पण या संदर्भात त्यांनी काहीही केले नाही, याबाबतची जबाबदारी ही डॉ. पद्मसिंह पाटील या पाटबंधारे मंत्री असलेल्या व्यक्तीची आहे.**

(२) "सभापती महोदय, जो १४ कोटी ६२ लाख रुपये खर्च करणे आवश्यक होते, तो पूर्ण खर्च या वर्षात केला जाईल." असे त्यांनी सांगितले (२१ मार्च २०००) व त्यानंतर "अध्यक्ष महोदय, उसमे साडे नऊ करोड रुपये खर्च करने की मांग सन्माननीय सदस्य कर रहे है, उतना जरुर करेंगे." असेही त्यांनी सभागृहाला सांगितले. **पण या संदर्भात त्यांनी काहीही केले नाही, याबाबतची जबाबदारी ही डॉ. पद्मसिंह पाटील या पाटबंधारे मंत्री असलेल्या व्यक्तीची आहे.**

पाटबंधारे मंत्री या पदावर विराजमान असलेल्या डॉ. पद्मसिंह पाटील या व्यक्तीचे उपरोक्त वर्तन सांसदिय प्रथा परंपरांना काळिमा फासणारे, अनुशेषग्रस्त भागातील सर्वसाधारण अनुशेष तर सोडाच, पण जीव घेणारा अनुशेष दूर करण्याबाबत सुद्धा तुच्छता दर्शविणारे असून मोर्णेच्या प्रभाव क्षेत्रातील लाख मोलाची जीवित हानी व अगणित वित्त हानीस, तसेच हजारो लोकांच्या मानसिक क्लेशास कारणीभूत ठरले आहे. मोर्णा नदीच्या काठावरील अकोला शहराच्या पूरप्रभाव क्षेत्रातून वस्तीला असलेले हजारो लोक आता पावसाच्या साध्या सरी जरी आल्या तरी अस्वस्थ होताहेत. मेघांच्या नुसत्या गडगडाटाने सुद्धा अनेक रात्री जागून काढण्याची परिस्थिती त्यांच्यावर पुन्हा आली आहे. म्हणूनच डॉ. पद्मसिंह पाटील यांनी तात्काळ त्या पदावरून राजीनामा द्यावा अशी मागणी मी करीत आहे.

९) सभागृहात येणारा मंत्री आपल्या विभागाने तयार करून दिलेली "कागदोपत्री भूमिका" बगलेत घेऊनच सभागृहात येत असतो. विभागातर्फे या कागदपत्रावर त्या विभागाच्या सचिवांची अंतिम स्वाक्षरी असते. ही "कागदोपत्री भूमिका" तयार करवून घेणे हे सचिवाचे काम असते, त्याबरोबरच चर्चेच्याप्रसंगी आपल्या मंत्र्यांने सभागृहात काय आश्वासने दिली याची नोंद ठेवून त्याची अंमलबजावणी करणे हेही त्या विभागाच्या सचिवाचेच काम असते. त्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांचा फार मोठा ताफा त्याच्या हाताखाली काम करीत असतो. "सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल आणि जास्तीत जास्त आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल." असे आश्वासन २१ मार्च २००० रोजी आपल्या विभागाच्या मंत्र्यांनी दिले असतांना व २० एप्रिल २००० रोजी ते अधिवेशन संपले असतांना, "मा. मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये जे आश्वासन दिले त्याची माहिती आमच्याकडे नव्हती त्यामुळे आम्ही ताबडतोब यावर कारवाई करू शकलो नाही" असे जून २००० मध्ये सांगत फिरणाऱ्या, व अधिकृतपणे आश्वासन कळल्यानंतरसुद्धा, जून २००२ पर्यंत, म्हणजे जवळ जवळ २ वर्षे, **त्याबाबत कोणतीही कारवाई न करणाऱ्या पाटबंधारे सचिवांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे अशीही मागणी मी करीत आहे.**

******

**सहपत्र** :- "अकोला पूर नियंत्रण योजना" या विषयावर (महाराष्ट्र विधानपरिषद / पहिले अधिवेशन, २०००) मंगळवार, दिनांक २१ मार्च, २००० रोजी झालेल्या चर्चेच्या अधिकृत प्रतिवेदनाच्या, (खंड १२१, क्रमांक ४) पृष्ठ ४/२ ते ४/७ ची सत्यप्रतिलीपी सोबत जोडलेली आहे.

******

प्रति,
**संपादक/वार्ताहर**
मा. महोदय

स.न.वि.वि.

उपरोक्त परिपत्रकास/वृत्तास/लेखास आपल्या वृत्तपत्रामध्ये यथोचित प्रसिध्दी द्यावी म्हणून पाठवित आहे.

आपला विनीत

**(बी.टी.देशमुख)**

विधान परिषद सदस्य.

दिनांक : ०५.०९.२००२ रोजीच्या वृत्तपत्रिय प्रसारणाची प्रत वर जशीच्या तशी दिलेली आहे.

३ सप्टेंबर २००१ पासून पुढच्या ३-४ आठवडे आम्ही सारे पदाधिकारी पाटबंधारे विभागाला सादर करावयाच्या उत्तराची तयारी करीत होतो. अनेक अधिकृत दस्तऐवज व कागदपत्रांची जुळवाजुळव करून याबाबतची कैफियत उभी करतांना आमच्या अनेक बैठकी झाल्या. मसुद्याला अंतिम स्वरूप रविभवन, नागपूर येथे झालेल्या बैठकीत देण्यात आले. या बैठकीला पुनर्रचित अनुशेष व निर्देशांक समितीचे निमंत्रक श्री. मधुकरराव किम्मतकर व तज्ञ सल्लागार अभियंता श्री. ए.के. शेणोलीकर हे उपस्थित होते.

१९९५ मध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त ४ लहान लहान लघुपाटबंधारे प्रकल्प ज्या पाटबंधारे विभागाला अजून पुरे करता आले नाही त्यांनी अकोला जिल्ह्यात ९१.१६ हजार हेक्टरचा अनुशेष अनिर्मूलनीय आहे असे मा. राज्यपालांना कळवावे हा 'न भयं् न लज्जा' या श्रेणीतील प्रकल्प म्हणावा लागेल. "**पाटबंधारे जात्याच्या जेत्र अधिज ार्यांज डू-ा प्राप्त झालेल्या माहितीवरु-ा हे स्पष्ट आहे जी, विदर्भ मराठवाड्यामध्ये अंमलबजावजीसाठी पुरेशा प्रमाजात प्रज ल्प उपलब्ध असल्या-ो तेथे -िधी** सामावू□घेज्याच्या जमतेवर जोजतीही अडचज □ही." असे मा. राज्यपालाच्या निदेशाच्या परिच्छेद ७.९ मध्ये नमुद केलेले आहे हे वाचल्यावर जरी पाटबंधारे सचिवांनी कळविले नाही तरी हे चार प्रकल्प धुळ खात पडलेले आहे हे मा. राज्यपालांना कुठून तरी कळले असे आपल्याला वाटल्यावाचून राहात नाही. **पाटबंधारे सचिवांनी पुरविलेल्या माहितीवर विसंबून न राहता क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या माहितीवर विसंबून राज्यपालांना आदेश काढावे लागतात या एका कारणासाठीसुद्धा पाटबंधारे सचिवांनी लाजेने मान खाली घातली पाहिजे.**

## पूरनियंत्रणाच्या कामाची आवश्यकता व गुणवत्ता

**२७.** केवळ चार लहान प्रकल्प वर होताहेत म्हणून अकोला पूरनियंत्रणाची कामे वगळणे, पाडून ठेवणे, किंवा जिरवणे अत्यंत अयोग्य आहे याची कारणे पुढील प्रमाणे :-

१) मोर्णा नदीच्या जलग्रहण क्षेत्रातील शंभर टक्के येवा अडविला जावू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

२) दगडपारवा धरणापासून तर अकोला शहरापर्यंत विद्रुपा नदीच्या पाणलोट क्षेत्रात व मोर्णा धरणापासून तर अकोला शहरापर्यंतच्या मोर्णा नदीच्या पाणलोट क्षेत्रात ७ ते ८ दशलक्ष घनमिटर येवा साठविण्यासाठी कोणतेही योग्य असे प्रकल्प स्थळ उपलब्ध नाही.

३) पूर किंवा महापूर हा काही दररोज येत नाही. ५-१० वर्षातून एखाद्या दुसऱ्या वेळेला तो येतो. चारही लघुपाटबंधारे योजनांचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाले व या योजना साठवण क्षमते एवढ्या पूर्ण भरल्यानंतर पाणलोट क्षेत्रात एकाच वेळी अतिवृष्टी झाल्यास काय होणार? अकोला शहरात महापूर येणार. यापेक्षा या प्रश्नाचे वेगळे उत्तर त्यावेळी देता येत नव्हते व आजही देता येत नाही व मग पूर्वीच्या प्रमाणेच शहरात जिवित व वित्त हानी होणार हाच त्याचा परिणाम उघड दिसून येत आहे.

४) ५-१० वर्षातून एखाद दुसऱ्या वेळी येणाऱ्या अशा प्रसंगाला तोंड देण्यासाठी अकोला शहरात मोर्णा नदीच्या दोन्ही तिरावर पूर संरक्षक दगडी भिंत बांधणे, शक्य तेथे नदीचे रुंदीकरण करणे, मातीचा बांध घालणे, नदीपात्रातील अडथळे दूर करणे, दगडी बंधारे व चिडीया पूल तोडणे, कठीण खडकांचे अडथळे काढणे ही पूर संरक्षक कामे त्यामुळेच कोणत्याही परिस्थितीत टाळता येण्यासारखी नाहीत.

५) संभाव्य अतिवृष्टी लक्षात घेवून अतिवृष्टीपूर्वीच्या काळात धरणातील पाणी साठा रिकामा करुन पूरेशी साठवण क्षमता अतिवृष्टीसाठी शिल्लक ठेवण्याच्या कामाचे बिनचुक अंदाज बांधता न आल्यास किंवा असा अंदाज बांधल्यावर अंदाजापेक्षा जास्त अतिवृष्टी झाल्यास चारही प्रकल्प साठवण क्षमते एवढे पूर्ण भरलेले असतांना एकाच वेळी पाणलोट क्षेत्रामध्ये होणाऱ्या अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने थोडेफार धरणहि रिकामे करण्याचा निर्णय घेण्याची गरज भासली, **तर नैसर्गिकरित्या येणाऱ्या महापूरामध्ये अशा निर्णयामुळे कृत्रिम कारणाने मोठी वाढ होते व अशा वेळी ही धरणे बांधली नसती तर बरे झाले असते** असे वाटल्यावाचून रहात नाही. औषधाची जशी एक "रिॲक्शन" असते तशीच उपाययोजनेची सुद्धा "रिॲक्शन" असते. नैसर्गिकरित्या जो पूर आला असता त्याला तोंड देण्यासाठी आपल्याला तयार रहावेच लागते. पण पूर्ण क्षमतेने भरुन असलेल्या धरणातील पाणीसाठा एकाच वेळी या सर्व धरणाच्या पाणलोटक्षेत्रामध्ये होणाऱ्या अतिवृष्टीमुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या कारणासाठी थोडाजरी कमी करण्याचा निर्णय घ्यावा लागला तर "नैसर्गिकरित्या जो महापूर आला असता त्यात कृत्रिम कारणानी पडलेली भर" ही या उपाययोजनेची रिॲक्शन थोपवून धरण्यासाठी अकोला शहरातील पूर नियंत्रणाची कामे अत्यंत अपरिहार्य ठरतात. हे 'शास्त्र' आहे आणि अशा पूरनियंत्रणाच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्वच धरणांना "महापूरात होणारी कृत्रिम वाढ" या कारणाचा शास्त्रिय विचार करावाच लागतो.

६) योजनेचा प्रस्ताव मांडणाऱ्या यादवराव सुर्यवंशी यांच्यापासून तर अधिक्षक अभियंता, मुख्य अभियंता, पाटबंधारे सचिव, पाटबंधारे मंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ या सर्वांनी पूरनियंत्रणाच्या कामाचे प्राथम्य मान्य केलेले आहे. त्याप्रमाणे शासननिर्णय निर्गमित केलेले आहेत. १९९५ मध्ये ४ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिलेली असतांनासुद्धा १९९६ व ९७ मध्ये पूरनियंत्रणाच्या कामांना मान्यता दिली ते त्याचे महत्व लक्षात घेऊनच.

## पाटबंधारे प्रकल्पांचा निधी

**२८.** मा. राज्यपालांच्या निदेशानुसार जिल्हानिहाय पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी जो निधी दिला जाणार आहे त्याचे तपशील नमुद असलेला एक तक्ता शासनाच्या वतीने सभागृहामध्ये वितरित करण्यात आला होता. सन २००२-२००३ या वर्षाकरिता या तक्त्यानुसार अकोला जिल्ह्यासाठी १९० कोटी रुपयाचा निधी दिला जाईल असे त्यात नमुद असतांना अकोला जिल्ह्यातील सर्व प्रकल्पासाठी १७० कोटी रुपयाची घोषणा होणे हे जेवढे दुःखदायक आहे त्यापेक्षा जास्त क्लेष कारक पूर नियंत्रणाच्या कामासाठी कोणताही निधी उपलब्ध न होणे हे आहे.

## टेंभूचे चित्र पहा व अकोल्याचे चित्र पहा

**२९.** महाराष्ट्राच्या एका भागामध्ये "टेंभू उपसा सिंचन योजनेला सन १९९५-९६ मध्ये रुपये १४१६.५९ कोटी रुपये किमतीला प्रशासकीय मान्यता दिली जाते. ४०६ मिटर उंचीवर पाणी चढवून शेतीला ओलीत करण्याची व्यवस्था या उपसासिंचन योजनेमध्ये आहे. दरवर्षी दरहेक्टरी पंपींगसाठी विजेचा खर्च ५७७५० रुपये असेल हे निश्चित झालेले आहे. असे असतांना मार्च २००१ पर्यंत ३५२.९३ कोटी रुपये प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

याच्या उलट जानेवारी १९९७ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त अकोला पूरनियंत्रण भाग दोन या १४.६२ कोटी रुपयाच्या प्रकल्पावर आतापावेतो निम्मा खर्च सुद्धा होत नाही. प्रकल्पाला १४१ कोटी खर्च रुपये किंमतीला सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी लागेल. "अधिवेशन संपेपावेतो सुधारित प्रशासकीय मान्यता देऊ" असे आश्वासन देऊन सात अधिवेशने पार पडली तरी सुधारित प्रशासकीय मान्यता सुद्धा दिली जात नाही याला काय म्हणावे?

## अकोला शहर पूर संरक्षण योजना - भाग एक : सद्यःस्थिती

**३०.** अकोला पूर संरक्षक योजना भाग - १ च्या कामास शासनाने निर्णय क्र. १०९५/१९७/९५/सिं.व्य.(कामे) दिनांक ०८.०७.१९९६ अन्वये १४७.२० लक्ष रुपयास मान्यता दिलेली होती. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. नदीपात्रातील अडथळे काढणे, चिडीयापूल अनिकट इत्यादी व सा.क्र. २८८० ते ३६६० मी. मधील कठीण खडक काढणे, याचा खर्च रु. ६७.५७ लक्ष, धरलेला असून हिंदू स्मशानभूमी ते रेल्वे पुलापर्यंत नदी पात्राचे रुंदीकरण सा.क्र. ५३४० ते ५८८० मी. याचा खर्च रु. ४९.८० लक्ष अंदाजित करण्यात आला आहे. अनुषंगिक खर्च रुपये २९.६७ लक्ष धरून एकूण १४७.२० लक्ष रुपये किंमतीला प्रशासकीय मान्यता होती. **ही कामे बहुतांशी पूर्ण झाली आहेत.**

## अकोला पूरनियंत्रण योजना - भाग दोन : सद्यःस्थिती

**३१.** अकोला पूर संरक्षण योजना भाग २ च्या कामास प्रथम शासननिर्णय ६ जानेवारी १९९७ ला (तांत्रिक चुकीमुळे त्यानंतर शासन निर्णय क्र. १०९५/१९७/सि.व्य.(कामे), दिनांक ०२.०४.९७) अन्वये १४६२.५४ लक्ष रु. स प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. त्यामध्ये एक म्हणजे मोर्णा नदीचे दोन्ही तीरावर दगडी पूर संरक्षक भिंत बांधणे व नॉन रिटर्न व्हॉल्व बसविणे. सा.क्र. २५२० ते ५३४० मी. ....रु. ७८७.०० लक्ष व दुसरे म्हणजे हिंगणा गाव ते रा.म.क्र. ६ वरील बायपास पुलापर्यंत नदीपात्र रुंद करणे व दोन्ही तीरावर मार्गदर्शक बांध सा.क्र. ० ते २५२० मी. ..... ३८०.७० लक्ष, त्याशिवाय अनुषंगिक खर्च रुपये २९४.८४ लक्ष अशी एकूण १४६२.५४ लक्ष रुपये किमतीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या भागातील सा.क्र. ० ते २५२० मी. पर्यंतच्या एकूण ९,४८,१९७ घ.मी. खोदकामापैकी ६,५८,००१ घ.मि. खोदकाम व ५,०३,४४२ घ.मी. भरावापैकी ३,८९,८४४ घ.मी. भरावाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहे. सा.क्र. २५२० मी. ते ५३४० मी. मध्ये नदीच्या दोन्ही तीरावर दगडी भिंत बांधण्याचे काम या योजनेत प्रस्तावित आहे. या दगडी

भिंतीचे संकल्पन (डिझाईन) मेरी नाशिक यांच्याकडून प्राप्त करण्यात आले ही वस्तुस्थिती आहे.

### भाग दोन प्रकल्पातील महत्वाचे दोष

**३२.** अकोला पूर संरक्षक योजना भाग-२ च्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकामध्ये एकूण १८ नॉन रिटर्न व्हाल्व व ३ पंपांची तरतूद करण्यात आली होती. सविस्तर सर्वेक्षणानंतर मोर्णा नदीला मिळणाऱ्या २९ नाल्यांवर सर्व ठिकाणी नॉन रिटर्न व्हाल्व व ६४ पंप बसविणे आवश्यक असल्याचे बऱ्याच उशीरा निदर्शनास आले. मुळ योजनेतील हा पहिला मुख्य दोष सांगता येईल. हिंगणा गावच्या वरील बाजूस मोर्णा नदीच्या दोन्ही तीरावर व विद्रुपा नदीच्या डाव्या तीरावर पूर पातळीपर्यंत मातीचे बांध घालणे अत्यावश्यक असल्याची बाब मुळ प्रशासकीय मान्यता देतांना लक्षात आलेली नव्हती. सविस्तर सर्वेक्षण व प्रतिकृती अभ्यास पूर्ण झाल्यानंतर ती लक्षात आली. हा दुसरा महत्वाचा दोष. अकोला पूर संरक्षण योजनेच्या कामासाठी एकूण ८२.२० हेक्टर जमीन संपादित करणे जरुरीचे आहे. मूळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये भुसंपादनासाठी तरतूद करण्यात आलेली नव्हती. ही चौथी मोठी तृटी होती.

### १४ कोटी रुपयाची योजना १४१ कोटी रुपयाची झाली

**३३.** वरील सर्व तृटी व दोष विचारात घेऊन अकोला शहर पूर संरक्षण योजना भाग - २ चा सुधारित प्रस्ताव रु. १४,१५७.६८ लक्ष खर्चाचा तयार करण्यात आला आहे. सुधारित प्रस्तावामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा अंतर्भाव आहे.

१) रा.म.क्र. ६ पासून रेल्वे पुलापर्यंत मोर्णा नदीच्या दोन्ही तीरावर दगडी पूर संरक्षक भिंत बांधणे.

२) हिंगणा गावापासून रा.म.क्र. ६ वरील पुलापर्यंत नदीपात्राचे रुंदीकरण करणे व नदीच्या दोन्ही तीरावर मातीचे मार्गदर्शक बांध घालणे.

३) सविस्तर सर्वेक्षणानंतर हिंगणा गावाच्या उर्ध्व बाजूस मोर्णा नदीच्या दोन्ही तीरावर २१६० मी. तसेच विद्रुपा नदीच्या डाव्या तीरावर १२६० मी. लांबीपर्यंत मातीचा मार्गदर्शक बांध घालणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे व त्या अनुषंगाने सुधारित प्रस्तावामध्ये ही बाब अंतर्भूत केली आहे.

४) मोर्णा नदीला पूर असतांना, अकोला शहराच्या परिसरात अतिवृष्टी झाल्याने हे अतिवृष्टीचे पाणी नॉन रिटर्न व्हॉल्व बंद असल्याने नाल्यामध्ये तुंबून राहणार आहे व हे पाणी उपसून काढण्यासाठी पंपांची तरतूद केलेली आहे. मूळ प्र.मा. च्या अंदाजपत्रकात फक्त १८ नॉन रिटर्न व्हॉल्व व ३ पंपांची तरतूद होती आता सर्व २९ नाल्यांवर नॉन रिटर्न व्हॉल्व तसेच पंप प्रस्तावित करण्यात आले आहेत.

५) अकोला पूर संरक्षण योजनेच्या भाग २ च्या कामास लागणाऱ्या भूसंपादनाची मूळ प्र.मा.प्राप्त प्रस्तावामध्ये तरतूद करण्यात आलेली नव्हती. सुधारित प्रस्तावामध्ये ८२.२० हेक्टर क्षेत्रासाठी भूसंपादन प्रस्तावित करण्यात आले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन सु.प्र.मा. चा प्रस्ताव तयार करण्यात आला असून या प्रस्तावाचा एकूण खर्च रु. १४१५७.६८ लक्ष इतका आहे.

### जबाबदारी पाटबंधारे मंत्र्यांचीच

**३४.** अकोला पूरनियंत्रण योजना या विषयावर तारांकित प्रश्न क्रमांक २६६२ वर झालेल्या अनुपुरक चर्चेमध्ये निसंदिग्ध शब्दात दिलेले आश्वासन पाटबंधारे मंत्र्यांनी पाळले असते तर आजचा हाहाःकार उडाला नसता "या योजनेचा अंदाजित खर्च १४ कोटी रुपये होता, तो आता १४१ कोटी रुपयांवर गेला." असे पाटबंधारे मंत्र्यांनी सभागृहाला सांगितले व त्यानंतर "अध्यक्ष महाराज, अर्थात, शासनाला ही योजना पूर्ण करावयाची आहे. योजनेचा अंदाजित खर्च वाढणार आहे." असेही सांगितले. चर्चेच्या शेवटी **"सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल आणि जास्तीत जास्त आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल."** असेही स्पष्ट शब्दात त्यांनी सभागृहाला (२१ मार्च २०००) सांगितले. **पण या संदर्भात त्यांनी काहीही केले नाही,**

"सभापती महोदय, जो १४ कोटी ६२ लाख रुपये खर्च करणे आवश्यक होते, तो पूर्ण खर्च या वर्षात केला जाईल." असे त्यांनी सांगितले (२१ मार्च २०००) व त्यानंतर "अध्यक्ष महोदय, उसमे साडे नऊ करोड रुपये खर्च करने की मांग सन्माननीय सदस्य कर रहे है, उतना जरुर करेंगे." असेही त्यांनी सभागृहाला सांगितले. **पण या संदर्भात त्यांनी काहीही केले नाही,**

पाटबंधारे मंत्री या पदावर विराजमान असलेल्या डॉ. पद्मसिंह पाटील या व्यक्तीचे उपरोक्त वर्तन सांसदिय प्रथा परंपरांना काळिमा फासणारे, अनुशेषग्रस्त भागातील सर्वसाधारण अनुशेष तर सोडाच, पण जीव घेणारा अनुशेष दूर करण्याबाबत सुद्धा तुच्छता दर्शविणारे असून मोर्णेच्या प्रभाव क्षेत्रातील लाख मोलाची जीवित हानी व अगणित वित्त हानीस, तसेच हजारो लोकांच्या मानसिक क्लेशास कारणीभूत ठरले आहे.

### गेल्या १५ दिवसात ठिकठिकाणी काय झाले?

**३५.** मोर्णेच्या पाणलोट क्षेत्रामध्ये चार पाटबंधारे प्रकल्प बांधण्याची उपाययोजना ही पूरनियंत्रणाच्या कामी पडणारी एक उपयुक्त अशी उपाययोजना असली तरी अकोला पूर नियंत्रण योजना भाग-२ ची उपरोक्त कामे पार न पाडल्यास या उपाययोजनेची जोरदार 'रिॲक्शन' सुद्धा येवू शकते. संभाव्य अतिवृष्टी लक्षात घेवून अतिवृष्टीपूर्वीच्या काळात धरणातील पाणी साठा रिकामा करून पुरेशी साठवण क्षमता अतिवृष्टीसाठी शिल्लक ठेवण्याच्या कामाचे बिनचुक अंदाज बांधता न आल्यास किंवा असा अंदाज बांधल्यावर अंदाजापेक्षा जास्त अतिवृष्टी झाल्यास चारही प्रकल्प साठवण क्षमतेएवढे पूर्ण भरलेले असतांना एकाच वेळी पाणलोट क्षेत्रामध्ये होणाऱ्या अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने थोडेफार धरणही रिकामे करण्याचा निर्णय घेण्याची गरज भासली, तर नैसर्गिकरित्या येणाऱ्या महापुरामध्ये अशा निर्णयामुळे कृत्रिम कारणाने मोठी वाढ होते व अशा वेळी ही धरणे बांधली नसती तर बरे झाले असते असे वाटल्यावाचून रहात नाही. औषधाची जशी एक "रिॲक्शन" असते तशीच उपाययोजनेची सुद्धा "रिॲक्शन" असते. **नैसर्गिकरित्या जो पूर आला असता त्याला तोंड देण्यासाठी आपल्याला तयार रहावेच लागते. पण पूर्ण क्षमतेने भरून असलेल्या धरणातील पाणीसाठा एकाच वेळी या सर्व धरणांच्या पाणलोटक्षेत्रामध्ये होणाऱ्या अतिवृष्टीमुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या कारणासाठी थोडाजरी कमी करण्याचा निर्णय घ्यावा लागला तर "नैसर्गिकरित्या जो महापूर आला असता त्यात मानवनिर्मित कृत्रिम कारणानी पडलेली भर" ही या उपाययोजनेची रिॲक्शन थोपवून धरण्यासाठी अकोला शहरातील पूर नियंत्रणाची कामे अत्यंत अपरिहार्य ठरतात.** हे 'शास्त्र' आहे आणि अशा पूरनियंत्रणाच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्वच धरणांना "महापुरात होणारी कृत्रिम वाढ" या कारणांचा शास्त्रीय विचार करावाच लागतो. गेल्या १५ दिवसांचा विचार करतो म्हटले तरी पुरामध्ये मानवनिर्मित कारणानी वाढ झाल्याची अर्धा डझनापेक्षा जास्त उदाहरणे तरातरा डोळ्यासमोर येतात ती पुढील प्रमाणे :-

**(१) काटेपूर्णा प्रकल्प :** अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा नदीवरील महान धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये तीव्र अतिवृष्टी झाल्यामुळे धरणाच्या सुरक्षिततेसाठी धरणाचे दहाही दरवाजे उघडावे लागेल. नैसर्गिकरित्या जो पूर आला असता त्यापेक्षा कितीतरी पट जास्त पूर त्यामुळे आला. महान गावची व नदी खालील भागात काय स्थिती झाली हे आपण पाहिलेच आहे. शेकडो शेतकऱ्यांची हजारो एकर शेती खरवडून निघाली.

**(२) अरुणावती प्रकल्प :** अरुणावती प्रकल्पांच्या जलग्रहण क्षेत्रात १ व २ तारखेला झालेल्या तीव्र अतिवृष्टीमुळे धरणाची सुरक्षितता लक्षात घेऊन धरणाचे दरवाजे उघडून संचित जलसंचय नदीत सोडला गेल्याने नैसर्गिकरित्या नदीला जो पूर आला असता त्यापेक्षा कितीतरी जास्त पूर नदीखालच्या क्षेत्रात आल्यामुळे आर्णि शहराची व इतर भागाची काय स्थिती झाली हे आपण पाहीले आहे.

**(३) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प :** यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील इसापूर येथे असलेल्या उर्ध्व पैनगंगा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १ व २

***योजनेचा प्रस्ताव मांडणाऱ्या यादवराव सुर्यवंशी यांच्यापासून तर अधिक्षक अभियंता, मुख्य अभियंता, पाटबंधारे सचिव, पाटबंधारे मंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ या सर्वांनी पूरनियंत्रणाच्या कामाचे प्राथम्य मान्य केलेले आहे. त्याप्रमाणे शासननिर्णय निर्गमित केलेले आहेत. १९९५ मध्ये ४ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिलेली असतांनासुद्धा १९९६ व ९७ मध्ये पूरनियंत्रणाच्या कामांना मान्यता दिली ते त्याचे महत्व लक्षात घेऊनच.***

# अकोला पूर नियंत्रण योजना

***महाराष्ट्र विधानपरिषद : मंगळवार, दिनांक २१ मार्च, २००० : पहिले अधिवेशन, २०००***

**अधिकृत प्रतिवेदन, खंड १२१, क्रमांक ४, पृष्ठ ४/२ ते ४/७**

* २६६२ **सर्वश्री प.म.पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे** तारांकित प्रश्न क्रमांक ६६ ला दिनांक १३ डिसेंबर, १९९९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्णा नदीच्या पूरापासून अकोला शहर व परिसराचा बचाव व्हावा म्हणून अकोला पूरसंरक्षक कामे भाग-२ या १४६२ लक्ष रुपयांच्या ६ जानेवारीस १९९७ च्या शासन निर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त बांधकामाच्या कार्यपूर्तीचे कशाप्रकारे नियोजन करण्यात आलेले आहे.

(२) नियोजन करण्यात आलेले नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत;

(३) केंद्रीय जल आयोगाकडे माहिती व शेऱ्यांच्या पूर्ततेसह १ ऑक्टोंबर, १९९९ रोजी मान्यतेसाठी फेर सादर केलेल्या प्रस्तावास त्या आयोगाची मान्यता मिळण्याची सद्यस्थिती काय आहे, अद्यापि मान्यता मिळाली नसल्यास, त्यासाठी करण्यात आलेल्या पाठपुराव्याचे स्वरुप काय आहे?

**श्री.बाळासाहेब थोरात, डॉ.पद्मसिंह पाटील यांच्या करिता** (१)प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकातील कामाचा वाव प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात बदलत असल्याने सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता घेऊन त्यानुसार कामे करण्याचे नियोजन आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकानुसार केंद्रीय जल आयोगास पाठविलेल्या प्रस्तावावरील शेऱ्यांची पूर्तता करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तथापि, प्रशासकीय मान्यतेसाठी प्राप्त अंदाजपत्रकानुसार, केंद्रीय जल आयोगास प्रस्ताव फेरसादर करावा लागेल.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, सभागृहामध्ये या विषयावर यापूर्वी आम्ही अनेकदा चर्चा उपस्थित केल्या आहेत. मा.राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आता त्यासंबंधीचा उल्लेख आला आहे, त्याबद्दल मी शासनाचे जरुर आभार मानतो. "निर्देशांक आणि अनुशेष समितीचा प्रादेशिक असमतोलावरील अहवाल शासनाने तत्वतः स्विकारला आहे." असा हा उल्लेख आहे. अकोला जिल्ह्याचा जलसिंचनाचा ९२ कोटीचा अनुशेष ९०५ कोटीचा झाला आहे, हे शासनाने आता अधिकृतपणे जाहिर केले आहे. माझे असे म्हणणे आहे की, अधिकाऱ्यांनी याबाबत जी भूमिका मागे घेतली आहे, ती अशी की, **या योजनेमध्ये लहान लहान चार धरणे बांधून होत आहेत. तेव्हा पूरसंरक्षक भाग २ ची गरज नाही म्हणून मा.उपमुख्यमंत्री आणि पाटबंधारे मंत्र्यांनी तो प्रस्ताव मांडून पाहिला पण नंतर फेटाळून लावला.** "विदर्भामध्ये वाढलेला बॅकलॉग भरुन काढावयाचा आहे. याची शासनाला जाणिव आहे. त्यासाठीच्या यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये ३०० कोटीची तरतूद ठेवली आहे." असे १९९५ मध्ये मा.उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. तसेच, "कन्सॉलिडेटेड फंडामधून आर्थिक तरतूद करता येईल" असेही सांगितले होते. माझे असे म्हणणे आहे की, आताच्या या उत्तरावरुन ही योजना पूर्ण करण्याचा निर्धार कायम आहे, त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. आपण सुधारित प्रशासकीय मान्यता किती रकमेला घेतली आहे? किंवा घेणार आहात? तीन वर्षापूर्वी साडे चौदा कोटीच्या रकमेला प्रशासकीय मान्यता आपण घेतली होती. तेवढे काम झाले आहे काय? नसल्यास, किती रकमेचे काम झाले झाले आहे.?

**श्री.बाळासाहेब थोरात :** या योजनेचे दोन भाग करण्यात आले आहेत. भाग एक मध्ये १ कोटी ४६ लक्ष रुपयाचे काम हाती घेण्यात आले.

**श्री.बी.टी.देशमुख :** याठिकाणी मी प्रश्न दुसऱ्या भागाचा विचारला आहे.

---

तारखेला जोरदार अतिवृष्टी झाल्याने धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणाचे दरवाजे उघडावे लागले व १ लक्ष घनफूट प्रतिसेकंद या दराने पाणी सोडावे लागले. नदीखालच्या भागामध्ये नैसर्गिकरित्या आला असता त्यापेक्षा कितीतरी जास्त पूर आला व जनजीवन विस्कळीत झाले. हजारो एकराची शेती वाहून गेली.

**(४) अडाण प्रकल्प :** अडाण धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये २३ ऑगस्ट २००२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणाचे काही दरवाजे उघडावे लागले व नैसर्गिकरित्या जो पूर आला असता त्यापेक्षा जास्त पूर आला. परिणामी दारव्हा तालुक्यातील जनजीवन संपूर्णपणे विस्कळित झाले. शेकडो एकरातील पिके वाहून गेली.

**(५) नळगंगा प्रकल्प :** बुलढाणा जिल्ह्यातील नळगंगा धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये २४ ऑगस्ट २००२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणाचे काही दरवाजे उघडावे लागले व नैसर्गिकरित्या जो पूर आला असता त्यापेक्षा जास्त पूर नळगंगेला आला. परिणामी मलकापूर व मोताळा तालुक्यातील जनजीवन संपूर्णपणे विस्कळित झाले. शेकडो एकरातील पिके वाहून गेली.

**(६) येळगाव प्रकल्प :** बुलढाणा जिल्ह्यातील येळगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये २ सप्टेंबर २००२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणाचे काही दरवाजे उघडावे लागले व नैसर्गिकरित्या जो पूर आला असता त्यापेक्षा जास्त पूर आला. परिणामी येळगाव, खुपगाव, सव या गावातील जनजीवन संपूर्णपणे विस्कळित झाले. शेकडो एकरातील पिके वाहून गेली.

**(७) मन प्रकल्प :** मन प्रकल्पाच्या जलग्रहण क्षेत्रात जोरदार अतिवृष्टी झाल्यामुळे धरणाच्या सुरक्षीततेसाठी उघडल्या गेलेले गेट जास्त बेजबाबदारपणे उघडल्या गेल्यामुळे बाळापूर शहरामध्ये नैसर्गिकरित्या आला असता त्यापेक्षा कितीतरी जास्त पूर आला. कोट्यावधी रुपयाची मालमत्तेची हानी झाली. देऊळगाव साकर्शा येथे एकदम आलेल्या पूराने चार व्यक्ती वाहून गेल्या. थोडे पाणी जास्त सोडल्याचा आरोप खरा मानला तरी अशा अतिवृष्टीच्या वेळी धरणाच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने पाणी सोडावेच लागते. नैसर्गिकरित्या येणाऱ्या पुरात त्यामुळे मानवनिर्मित कारणांनी वाढ होते ही वस्तुस्थिती कायम राहतेच.

(८) सप्टेंबरच्या पहिल्या २ दिवसात पाणलोट क्षेत्रात झालेल्या तीव्र अतिवृष्टीमुळे बुलढाणा जिल्ह्यातील नळगंगा, येळगाव धरणाच्या शिवाय ज्ञानगंगा, पेनटाकळी, मस, मन इत्यादी प्रकल्पांनी धोक्याची पातळी ओलांडल्याने धरणाचे दरवाजे उघडावे लागले. काही ठिकाणी ते स्वयंचलित असल्याने उघडल्या गेले. नदी खालच्या भागात नैसर्गिकरित्या पूर आला असता त्यापेक्षा कितीतरी जास्त पूर त्यामुळे आला.

### भाग २ च्या प्रस्तावाला सुधारीत प्रशासकिय मान्यता

३६. सभागृहात निसंदिग्ध शब्दात कबूल केल्याप्रमाणे १४१ कोटी रुपयाच्या अकोला पूरनियंत्रण भाग २ च्या प्रस्तावाला सुधारित प्रशासकीय मान्यता तावडतोब दिली पाहिजे अशी मी मागणी करीत आहे. **अशी दुर्देवी परिस्थिती येवू नये पण उर्ध्वभागातील चार प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर एकाच वेळी या सर्व धरणाच्या जलग्रहण क्षेत्रात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे धरणांची सुरक्षितता लक्षात घेऊन धरणाची दारे उघडण्याची पाळी आली तर १९९४ मध्ये झाली तेवढीच अतिवृष्टी झालेली असली तरी येणारा पूर त्यापेक्षा कितीतरी जास्त असेल.अशा दुर्देवी प्रसंगी अकोला शहरातील त्यावेळचे संतप्त नागरिक ज्यांच्या पुतळ्यावर शेणाचे गोळे मारतील त्यातील पहिला पुतळा आजच्या पाटबंधारे मंत्र्यांचा व दुसरा पुतळा आजच्या पाटबंधारे सचिवांचा असेल. तिसऱ्या जागेवर आजच्या मुख्यमंत्र्यांना उभे करण्याचा पाटबंधारे विभागाचा प्रयत्न त्यांनी यशस्वी होऊ देऊ नये अशी मा.मुख्यमंत्र्यांना कळकळीची विनंती आहे.**

अकोला **बी.टी.देशमुख**

१३.०९.२००२ *विधानपरिषद सदस्य*

"भाग-२ या १४६२ लक्ष रुपयांच्या ६ जानेवारी, १९९७ च्या शासन निर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त बांधकामाच्या कार्यपूर्तीचे कशा प्रकारे नियोजन करण्यात आले आहे?" असा प्रश्न आहे. यामध्ये दिड कोटी रुपये आपण ठेवले होते, त्या योजनेबद्दल प्रश्न विचारले नाही. भाग-२ च्या संदर्भात आपल्या उत्तरात असे सांगण्यात आले आहे की, याच्या सुधारित अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता द्यावयाची आहे. माझे दोन प्रश्न असे आहे की, सुधारित अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे? तसेच १४ कोटी रुपयांना मान्यता देण्यात आली होती. तेवढी रक्कम झाली आहे का? तेवढी रक्कम खर्च झाली नसेल तर त्यातील किती रक्कम खर्च झाली आहे?

**डॉ.पद्मसिंह पाटील** : सभापती महोदय, भाग-२ च्या बाबतीत एकंदर १४ कोटी ६२ लाख रुपये खर्च होणार होता, त्यापैकी ५ कोटी ५७ लाख रुपये खर्च झालेला आहे. भाग-२ च्या कामाची सुधारित अंदाजित किंमत १४१ कोटी ५५ लाख रुपये आहे. आता आणखी हे काम बरेच वाढलेले आहे. त्याशिवाय शहरामध्ये २९ नाले बांधावयाचे असून त्यावर ६४ पंप बसविल्यानंतर या नाल्यातील पाणी पंपाद्वारे नदीमध्ये सोडावयाचे आहे. आणि यासाठी ५०,००० हॉर्स पॉवरचे पंप बसवावे लागणार आहेत, आणि त्याचा रिकरिंग एक्सपेन्सेस नगरपालिकेला सोसावा लागणार आहे. मग एवढा सारा खर्च करावयाचा का? प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा जो प्रश्न आहे त्याबाबत सांगावयाचे तर प्रशासकीय मान्यतेसाठीचा प्रस्ताव आलेला असून तो तपासण्याचे काम चालू आहे. **शक्यतो लवकरात लवकर यामध्ये आवश्यक ते बदल करुन सुधारित प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर देण्यात येईल.**

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, १९९६ मध्ये या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन सांगितले आहे की, या विभागाचा अनुशेष लक्षात घेता हा सबंध खर्च राज्यशासन योजना म्हणून करेल. याची आपल्याला माहिती आहे का?

**डॉ.पद्मसिंह पाटील** : सभापती महोदय, याचा खर्च राज्य शासन करील पण ही योजना चालू ठेवण्याचा खर्च नगरपालिकेला करावा लागणार आहे. राज्यशासन करणार नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य म्हणतात तशा प्रकारचा शब्द माझ्या माहितीप्रमाणे राज्य शासनाने दिलेला नाही.

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, हा नदीच्या पूर नियंत्रणाचा प्रश्न आहे. येथील नदीला पूर आल्यानंतर त्याचे पाणी शहरामध्ये शिरते. याला तेथील नगरपालिका कशी जबाबदार आहे? जर अशाप्रकारे पूर नियंत्रण करावयाचे असेल तर त्याबाबतीत जी काही प्रिन्सिपल्स मान्य केलेली आहेत, त्याप्रमाणे ही जबाबदारी पाटबंधारे खात्याची आहे. त्यामुळे या शहराला पूराच्या पाण्यापासून वाचविण्यासाठी आपल्यावरची जबाबदारी टाळून ती नगरपालिकेकडे देणे उचित होणार नाही. याबाबतीत कदाचित तुम्हाला नवीन सूत्र दिलेले असेल. नवीन टेक्निक मिळाले असेल, पण सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत त्याप्रमाणे आपण जी प्रिन्सिपल्स मान्य केलेली आहे. तर या शहराला पूराच्या पाण्यापासून वाचविणे ही योजना आहे. त्यासाठी कोणती योजना करावयाची हा पाटबंधारे खात्याचा प्रश्न आहे, ही तुमची जबाबदारी आहे. नगरपालिकेने खर्च करणे बरोबर होणार नाही. तेव्हा याबाबतीत आपण कोणती भूमिका घेणार आहात?

**डॉ.पद्मसिंह पाटील** : सभापती महोदय, पूरनियंत्रण करणे हे शासनाचे काम आहे हे मला कबूल आहे. पण पूर नियंत्रण योजना पूर्ण झाल्यानंतर त्याची दुरुस्ती आणि देखभाल करण्याची जबाबदारी नगरपरीषदेने स्विकारलेली आहे. तसा शब्द नगरपरिषदेने दिलेला आहे. १९९४ मध्ये या नदीला पूर आला तेव्हा विसर्ग ३१०६ घन मीटर प्रत्येक सेकंदाला इतका होता. तशाप्रकारचा पूर तेथे क्वचितच आलेला आहे. पूरामुळे होणारी प्राणहानी आणि वित्त हानी टाळण्यासाठी जे जे करावयास पाहिजे ते ते करीत आहोत. सुधारित अंदाजपत्रकाला मान्यता देत असतांना हे लक्षात घेतले पाहिजे की, तेथील **जी उपनदी आहे ती मोर्णा नदिला जाऊन मिळते, तेथे लघुपाटबंधाऱ्याचे काम सुरु आहे. तसेच उर्ध्व मोर्णा नदीचे काम सुरु आहे. ब्राम्हणवाडा येथील काम पूर्ण झालेले आहे.** या पुढच्या .....

**श्री.नितीन गडकरी** : सभापती, महोदय, माझे असे म्हणणे आहे की, नगरपालिकेचा याच्याशी संबंध नाही. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, या पूर नियंत्रणाच्या कोणत्याही प्रकारच्या कामाची जबाबदारी नगरपालिकेवर टाकणे बरोबर नाही. पूर नियंत्रणाचे काम हे नगरपालिकेचे काम नाही. तुम्ही बसविलेल्या पंपाचे वीज बिल देणे हे नगरपालिकेचे काम नाही. हे नगरपालिकेच्या कार्यकक्षेतील काम नाही. नदीला पूर येतो व त्यामुळे शहराला धोका निर्माण होतो हा राज्य सरकारच्या पुनर्वसन विभागाचा प्रश्न आहे. आतापर्यंत दोन वेळा अकोल्यामध्ये हाःहाकार माजला. मोठ्या प्रमाणावर जीवीत व वित्त हानी झाली. पूर्वीच्या सरकराने यामध्ये कमिटमेंट दिली आहे. नवीन सरकार आल्यानंतर नवीन सल्ला मिळाला काय? असल्यास तो सल्ला कोणता? यामध्ये नगरपालिकेला का गुंतवता?

**डॉ.पद्मसिंह पाटील** : योजनेच्या देखभालीसाठी नगरपालिकेने मागच्या काळातच तयारी दर्शविली होती.

**सभापती** : नगरपालिकेने तयारी दर्शविलेली आहे काय?

**डॉ.पद्मसिंह पाटील** : होय. ५० हजार हॉर्सपावरचे ६४ पंप्स बसवावे लागणार आहे व त्यांच्या देखभालीची जबाबदारी नगरपालिकेने घेतली आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : देखभालीचा प्रश्न योजना पूर्ण झाल्यानंतर येणार आहे. योजना पूर्ण न करण्यासाठी या प्रश्नाचा कोणी बहाणा म्हणून वापर करु नये. अध्यक्ष महाराज, ८ मार्च, १९९६ रोजी तत्कालिन मा. मुख्यमंत्र्यासमवेत या प्रश्नांवर चर्चा झाली होती. त्या बैठकीचे कार्यवृत्त माझेकडे आहे. त्यामध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी खालीलप्रमाणे आदेश दिल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. यातील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये नमूद केले आहे की, "अकोला नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. अशाप्रकारच्या कामासाठी नगरपालिकेला कर्ज दिले तर ते फेडण्याची तिची परिस्थिती नाही, असे सचिव नगरविकास यांनी स्पष्ट केले व त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी दुजोरा दिला त्यामुळे हे काम शासकीय खर्चातून राज्यस्तरीय योजना म्हणून हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला." माझा प्रश्न असा आहे की, भाग-२ ला सुधारित प्रशासकीय मान्यता केव्हा देणार व ती किती रकमेसाठी देणार?

**डॉ.पद्मसिंह पाटील** : या कामाची व्याप्ती बरीच वाढत आहे. १९९६ नंतर दगडपारवा पाझर तलावाला मान्यता देण्यात आली व ते काम आता प्रगतीपथावर आहे. यानंतर उर्ध्व मोर्णा....

**श्री.बी.टी.देशमुख** : दगड पारवा पाझर तलावाची मान्यता १९९५ मधील आहे, हे खरे आहे काय?

**डॉ.पद्मसिंह पाटील** : त्यांच्या प्रशासकीय मान्यतेची तारीख माझेकडे नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : ती तारीख माझ्या कडे आहे ना!

**डॉ.पद्मसिंह पाटील** : प्रशासकीय मान्यतेच्या तारीखेची माहिती देता येईल, परंतू धरण पूर्ण होत नाही, तोपर्यंत पाणी अडत नाही, पाणी अडत नाही व तोपर्यंत पूराचे ....

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, मा.मंत्री महोदय आम्हाला लहान मुलांप्रमाणे समजून उत्तरे देत आहेत. ही सारी चर्चा झालेली आहे. अशाप्रकारे त्यांनी उत्तरे देणे बरोबर नाही. त्यांनी अशी उत्तरे देणे शोभत नाही.

**डॉ.पद्मसिंह पाटील** : असे शब्द वापरणे आपल्याला शोभते काय?

(अडथळा)

**श्री.बी.टी.देशमुख** : काय अशोभनीय आहे? ठिक आहे. आपण बोला, मी आपले ऐकतो.

**डॉ.पद्मसिह पाटील : अध्यक्ष महाराज, या योजनेचा अंदाजित खर्च १४ कोटी रुपये होता. तो आता १४१ कोटी रुपयांवर गेला.** १९९४ साली जो पूर आला, त्यामध्ये बरीच वित्त हानी झाली आहे. त्यातील बऱ्याच झोपड्या नदीच्या पात्रात होत्या.....

**श्री.नितीन गडकरी** : अध्यक्ष महाराज, आता आपणच यामध्ये हस्तक्षेप केला पाहिजे. त्या जिल्ह्याचा ९०० कोटी रुपयांचा अनुशेष आहे. शासन स्तरावर ही योजना करण्याचे राज्य शासनाने मान्य केले आहे. शासनाने जबाबदारी स्विकारलेली असतांना आता मंत्रीमहोदयांना काय म्हणायचे आहे? शासनाला ही योजना करावयाची आहे की नाही? करावयाची असल्यास, शासन ती किती दिवसात करणार आहे. शासन या योजनेवर पैसे खर्च करणार आहे की नाही?

**डॉ.पद्मसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, अर्थात, शासनाला ही योजना पूर्ण करावयाची आहे. योजनेचा अंदाजित खर्च वाढणार आहे.** कामाची व्याप्ती वाढलेली आहे, तेव्हा ही बाब पुन्हा एकदा तपासून घेतो. यामध्ये जे जे करणे आवश्यक आहे ते केले जाईल. एखाद्या कामावर त्या अनुषेशामधील रक्कम खर्च करावी यालाही मर्यादा आहे. परंतू या प्रकरणी जे जे करणे शक्य आहे ते ते लवकरात लवकर केले जाईल.

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे.

सन्माननीय सदस्य आपल्या भागातील महत्वाचा प्रश्न उपस्थित करतात. यामागे त्यांची अशी इच्छा असते की, त्या भागातील प्रश्न सुटावेत, त्यामधून मार्ग निघावा. ४५ दिवस अगोदर प्रश्न दिलेला असतो. आम्ही या प्रश्नाच्या संदर्भात तपासून पहात आहोत. असे उत्तर देणे योग्य नाही. हा प्रश्न याठिकाणी चर्चेला येण्यापूर्वी जे काही तपासून पाहिले असेल ते तपासून नवीन योजना घेऊन यावयास पाहिजे होते. हा जटील प्रश्न आहे, जीवनमरणाचा प्रश्न आहे, असे असतांना पुन्हा आम्ही तपासून पाहू. असे सांगणे बरोबर नाही, यामुळे प्रश्न कसा सुटणार? म्हणून माझा हरकतीचा मुद्दा आहे की, हा प्रश्न पुन्हा योग्य रितीने तपासावा. तोपर्यंत हा प्रश्न रोखून ठेवावा. मंत्रीमहोदयांनी तयारीनीशी पुन्हा यावे. तोपर्यंत या प्रश्नावर चर्चा करू नये.

**श्री.बी.टी.देशमुख** : मा.विरोधी पक्ष नेत्यांनी या संदर्भात सांगितले. मा मंत्री महोदयांना वाईट वाटले असेल. परंतू प्रशासकीय मान्यतेच्या संदर्भात, पाणी अडविण्याच्या संदर्भात सभागृहात चर्चा झालेली आहे. माझ्याकडे त्यावेळचे सगळे प्रोसीडींग आहे, ते हवे तर वाचून दाखवितो. चारही धरणांची ही मान्यता अगोदरची म्हणजे १९९५ मधील आहे. किती पाणी अडेल या सगळ्यांचा अंदाज झाला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी आदेश दिला, पैसेसुद्धा दिले. १९९७ मध्ये पूरनियंत्रण भाग-२ ला प्रशासकीय मान्यता दिली. ५ कोटी रुपये खर्च देखील झालेला आहे. माझे म्हणणे असे आहे की, एकदा अकोल्याच्या पाणीपुरवठा योजनेच्याबाबतीत आपण मागे गेलेला होता. नंतर सभापती महोदयांनी आदेश दिलेले होते. माझे असे म्हणणे आहे की, सभागृहामध्ये झालेल्या चर्चेला कवडीमोलाने मोजावे हे आपले वागणे बरोबर नाही. आता आपल्याला मागे जाता येणार नाही, प्रश्न असा आहे की, **या प्रकरणी सुधारित प्रशासकीय मान्यता आपण केव्हा द्याल? लवकरात लवकर असे उत्तर नको.** तसे असेल तर सभापती महोदय, आपल्याला विनंती आहे की, हा प्रश्न आपण राखून ठेवावा. हे अधिवेशन संपण्याबरोबर सुधारित प्रशासकीय मान्यता देऊ असे सांगितले जाणार आहे काय?

**डॉ.पद्मसिंग पाटील : सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल आणि जास्तीत जास्त आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल.**

**श्री.नितीन गडकरी** : पुन्हा नव्याने विचार मांडला गेला. जी जूनी योजना आहे त्याबाबत मान्यता देणार आहात काय, हा खरा प्रश्न आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** अध्यक्ष महोदय, अधिवेशन संपण्याअगोदर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न आहे. त्यांनी होकारार्थी उत्तर दिलेले आहे. आता माझे असे म्हणणे आहे की, १६ वर्षामध्ये ९२ कोटीचा जलसिंचनाचा ९०० कोटी रुपयाचा बॅकलॉग या जिल्ह्याचा झाला. जास्तीत जास्त आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. १९९४ च्या पुरात २२ लोक मृत्यूमुखी पडले. २८०० जनावरे वाहून गेलेली आहेत. माझे असे म्हणणे आहे की, ही गोष्ट ३१ ऑगस्ट १९९४ रोजी झालेली महापूराची दुर्घटना आहे. तेव्हा पुढच्या अधिवेशनापर्यंत ९०० कोटी रुपयांच्या बॅकलॉगमधून १५ ते २० कोटी रुपयाची तरतूद खर्च केली जाईल, असे ठामपणे आपण सांगावे, मी या ३१ मार्चपर्यंत म्हणत नाही. तर पुढच्या अधिवेशनापर्यंत १५ ते २० कोटी रुपये या कामासाठी खर्च होईल, असे ठामपणे सांगितले जाईल काय?

**डॉ.पद्मसिह पाटील** : असे सांगता येणार नाही. याकरिता जास्तीत जास्त तरतूद करु आणि काम लवकरात लवकर पूर्ण करु एवढेच मी सांगू इच्छितो. दुसरा पर्याय नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : आपण सात हजार कोटी रुपये अनुशेष नसलेल्या भागात खर्च करु शकतो? येथे मोठा अनुशेष आहे, का पर्याय नाही? सात हजार कोटी रुपये आपण ३ वर्षामध्ये खर्च करु शकता? हे अनुशेष नसलेल्या ठिकाणी खर्च करु शकतो? मग अनुशेष असलेल्या ठिकाणी आपण १५ कोटी रुपये खर्च करु शकत नाही? ज्या ठिकाणी २२ माणसे मृत्यूमुखी पडलेली आहेत...

**श्री.कमलकिशोर कदम** : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला त्यास मा.मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले. परंतू सन्माननीय सदस्यांना जे उत्तर पाहिजे तेच उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे असा आग्रह त्यांना करता येणार नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : मला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. उत्तर ते देणार आहेत.

**श्री.कमलकिशोर कदम** : मंत्रीमहोदयांनी त्या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे...... परंतू आम्हाला पाहिजे तसे उत्तर मिळालेच पाहिजे, असा आकांडतांडव त्यांना करता येणार नाही..... (अडथळा) ......

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मा.सभापतींचे काम अजून त्यांच्याकडे सोपविलेले नाही. माझा, प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. मा.मंत्रीमहोदयांनी सांगावे की, ते काही करत नाहीत, हे कशासाठी बोलताहेत?

**श्री.अण्णा डांगे** : सभापती महोदय, १९९४ साली जो पूर आला त्यामध्ये २२ माणसे आणि २८०० जनावरे मेलीत. प्रत्यक्षात मी परिस्थिती पाहायला गेलो होतो. त्यावेळेला अशा प्रकारची संकटे आल्यानंतर लोकांची तसेच त्यांच्या वित्ताची हानी होऊ नये. म्हणून उपाययोजना करण्यासाठी एक समिती नेमली होती. त्या समितीने जी उपाययोजना सूचविली होती त्यामध्ये त्यांनी १४६२ लाख रुपयांचे काम करण्याचे प्रस्तावित केले होते. त्यावर आतापर्यंत फक्त पाच कोटी रुपये खर्च झाला आहे मुळात जे काम आहे ते म्हणजे जी नदी अकोला शहरातून वाहते त्याची खोली वाढवून, नदीतून गाळ काढून दोन्ही बाजूला टाकावयाचा आहे. आणि मुळात हेच काम थांबलेले आहे. मा.मंत्रीमहोदयांनी सुधारित योजनेला मान्यता देतो म्हणून सांगितले. आणि दुसऱ्या बाजुला केंद्रिय जलआयोगाकडे जायला पाहिजे असेही ते उत्तरात सांगतात तेव्हा यामध्ये खरे काय आहे? माझा प्रश्न असा आहे की, जी १४६५ लाखाची पहिली योजना मंजूर आहे. त्या योजनेतील काम किती दिवसांमध्ये पूर्ण करणार आहात?

**श्री.पद्मसिंह पाटील** : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी सांगितले की, लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याशिवाय **या योजनेवर आतापर्यंत ५.५७ कोटी रुपये खर्च झाले असले तरी ही योजना पूर्ण करण्यासाठी एकंदर १४१.५५ कोटी रुपये लागणार आहे.** म्हणून लवकरात लवकर ही योजना पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. आणि त्यासाठी जास्तीत जास्त आर्थिक तरतूद करण्यात येईल. असे मी सांगितले. याशिवाय दुसरे उत्तर मी याक्षणी देऊ शकतो?

**श्री.अण्णा डांगे** : सभापती महोदय, पहिल्या योजनेमधील उरलेले ९ कोटी रुपये तरी खर्च करणार काय एवढे तरी मंत्रीमहोदयांनी सांगावे.

**श्री.पद्मसिंह पाटील : सभापती महोदय, जो १४ कोटी ६२ लाख रुपये खर्च करणे आवश्यक होते, तो पूर्ण खर्च या वर्षात केला जाईल.**

**श्री. अजहर हुसेन** : अध्यक्ष महोदय, इस योजनापर ६ जनवरी, १९९७ को १४ करोड ६२ लाख रुपये खर्च होने का अंदाज था, अभी वह १४० करोड तक जाएगा. लेकिन खर्च केवल ५ करोड रुपये हुआ है, जो की १४ करोड रुपये का ३०-४० प्रतिशत ही है. इसलिये आने वाले वर्ष मे शासन को कम से कम १५-२० करोड रुपये खर्च करने मे क्या अडचण है?

**डॉ.पद्मसिंह पाटील : अध्यक्ष महोदय, उसमे साडे नऊ करोड रुपये खर्च करने की मांग सन्माननीय सदस्य कर रहे है, उतना जरुर करेंगे.**

******

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO. MAHBIL/2001/4448** Licenced to post without prepayment **LICENCE NO. NR/ATI/78/2002** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **21.09.2002**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,.......................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................